रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८७ । अंक ३४२ । पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in




# कृषीवल

रायगड, रविवार, दि. १९ मे २०२४

किंमत ४₹

**अलिबाग-नागाव रोडटच आमराई विकणे आहे**

१५.५ गुंठे, क्लियर टायटल, फ्रेश, हमरस्त्याला लागून सिटी सर्वे, संपूर्ण तार कंपाऊंड गेट, २४ X ७ सीसीटीव्ही कॅमेरा निरीक्षण, प्रिमियम लोकेशन, एस.टी. स्टॉपला लागून, नळ, इलेक्ट्रीसिटी पोल जवळच, Direct Party, एजंट सुद्धा चालेल.

संपर्क - ९७६९१०८१७०

## वेधक

### राज्यात मान्सून ६ जूनला

**पुणे :** नैऋत्य मोसमी वाऱ्याच्या प्रगतीसाठी सध्या हवामानातील आवश्यक घटक पूरक आहेत. त्यामुळे यंदाच्या मान्सूनची प्रगती वेगाने सुरू असून, तळकोकणात तो सहा जूनला हजेरी लावेल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. मान्सून रविवारी (ता. १९) दक्षिण अंदमानच्या समुद्रात दाखल होण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने यापूर्वी वर्तविली आहे. मान्सूनचे देशातील महाद्वार असलेल्या केरळमध्ये ३१ मे रोजी दाखल होणार असल्याचेही विभागाने जाहीर केले आहे.

### भाविकांवर काळाचा घाला

**नवी दिल्ली :** चालत्या प्रवासी बसने पट घेतल्यानं आगीत आठ भाविकांचा बळी गेल्यानं मोठी खळबळ उडाली. या घटनेत तब्बल २४ प्रवासी गंभीर जखमी झाले. ही घटना पलवल एक्स्प्रेस-वेवर शुक्रवारी रात्री नूह इथं घडली. पंजाब आणि चंदीगडचे भाविक मथुरा आणि वंदावनला दर्शनासाठी गेले होते. मात्र, मथुरा आणि वृंदावन दर्शन करुन परत येताना ही भीषण घटना घडली.

## राज्यात आघाडीला ४६ जागा

# विजय निश्चित

## काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगेंना विश्वास



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्रात महाविकास आघाडी लोकसभेच्या ४८ पैकी ४६ जागा जिंकणार असल्याचा दावा काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी शनिवारी (दि. १८) इंडिया आघाडीच्या मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत केला. देशात विश्वासघाताचे राजकारण सुरू आहे. मोदी सरकार संविधानाचा गैरवापर करीत आहे. धमकी, प्रलोभने दाखवून विरोधी पक्षांत फूट पाडली जात आहे. या सर्व गोष्टी मोदींच्या इशाऱ्यानुसार होत आहेत. पण, यावेळी जनता फसणार नाही. आता ही लढाई खुद्द जनता लढत आहे. त्यात निश्चितच जनतेचा विजय होईल, असा विश्वास खरगे यांनी व्यक्त केला.

पान २ वर

### मोदींचे आरोप बिनबुडाचे : पवार

**देशासमोर अनेक गंभीर समस्या आहेत. मात्र, भाजप जनतेचे लक्ष विचलीत करण्याचा प्रयत्न करत आहे, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केला. निवडणुकीत स्वातंत्र्यवीर सावरकरांचा मुद्दाच नाही. भाजपकडून मुद्दाम हा मुद्दा उचलला जात आहे. राहुल गांधी यांनी त्यावर कोणतेही वक्तव्य केलेले नाही. त्यामुळे पंतप्रधान असे बिनबुडाचे मुद्दे उपस्थित करत आहेत. त्यामुळे त्यांनी देशातील अनेक गंभीर समस्यांवर वक्तव्य करावे. मात्र, त्यांनी या समस्यांवर वक्तव्य केलेले नाही, असे शरद पवार म्हणाले.**

### मोदीजी, किती वेळा बोहल्यावर चढणार?

भाजप आणि मोदी म्हणजे ब्रह्मदेव नाहीत. मनी वसे ते स्वप्नी दिसे, मोदींच्याच मनात पाकिसतन आहे. आमच्यावर जे आरोप करतात, तेच देशद्रोही आहेत. आमच्याकडे पंतप्रधानपदासाठी अनेक चेहरे आहेत. मात्र, भाजपकडे एकच चेहरा आहे., तोही आता चालत नाहीत. मोदी आता किती वेळा बोहल्यावर चढणार? २०१४ नंतर २०१९ मध्येही ते बोहल्यावर चढले, असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी टोला लगावला. आपल्या देशातील जुमलापर्व ४ जून रोजी संपणार आहे. महाराष्ट्र, मुंबईला बदनाम करण्याचे कुटील कारस्थान होत आहे. मुंबई लुटून गुजरातला नेण्याचा डाव आहे. महाविकास आघाडीचे सरकार आल्यावर महाराष्ट्राचे वैभव आम्ही परत आणू, असेही उद्धव ठाकरे यांनी ठणकावले. बेकायदा सरकार आणि अंसवैधानिक मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांसोबत पंतप्रधान स्वतःच्या हुकूमशाहीचा प्रचार करत आहेत. जो देईल साथ, त्याचा करू घात हीच भाजपची नीती आहे. देशातील सर्व पक्ष संपवून भाजपच हा एकच पक्ष असेल, असे जे.पी. नड्डा म्हणाले होते. आता त्यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचीही गरज राहिली नाही. ज्या संस्थेने त्यांना जन्म दिला, त्याच संस्थेची आता त्यांना गरज राहिलेली नाही, असेही उद्धव ठाकरे म्हणाले.

# आठवडा बाजाराच्या जागेवर अतिक्रमण

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

कुर्डूस येथील गट नं. ३३२ मधील आठवडा बाजारच्या प्रस्तावित जागेत एका धनदांडग्याने बेकायदेशीररित्या अतिक्रमण करून बांधकाम सुरु केले आहे. याबाबत अलिबागचे तहसीलदार यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे. मात्र, दोन महिने उलटूनही प्रशासनाकडून कारवाई करण्यात आली नाही. कारवाई करण्यास टाळाळटाळ होत असल्याचा आरोप कुर्डूस ग्रामस्थ व ग्रामपंचायत कमिटीने केला आहे.

कुर्डूस गावालगत गट नंबर ३३२ मध्ये महसूल खात्याची जमीन आहे. ही बारा गुंठे जमीन आठवडा बाजारासाठी मिळावी यासाठी ग्रामस्थ मंडळ, ग्रामपंचायत

पान २ वर



- **कारवाई करण्यास तहसीलदारांकडून टाळाटाळ**
- **कुर्डूस ग्रामस्थ, ग्रामपंचायत कमिटीचा आरोप**

> शासनाची जमीन देण्यात आली नाही. ज्या व्यक्तीने बांधकाम केले आहे, ते अनधिकृत आहे किंवा नाही, याची पाहणी केली जाईल. त्यानंतर पुढील कार्यवाही केली जाईल. याबाबत तक्रारदारांसमवेत बोलणे झाले आहे.
>
> – विक्रम पाटील, तहसीलदार, अलिबाग

## १ जूनपासून मासेमारीवर बंदी

**रायगड :** राज्य सरकारच्या आदेशानुसार १ जूनपासून समुद्रात मासेमारी करता येणार नाही. हा बंदी कालावधी ३१ जुलैपर्यंत लागू करण्यात आला आहे. त्यामुळे कोकणातील विविध समुद्र, खाडी किनारी नौका विसावू लागल्या आहेत. या कालावधीत आदेशाचे उल्लंघन केल्यास मच्छिमारांवर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे मत्स्य विभागाने

पान २ वर

## वरंध घाट ३१ मेपर्यंत बंद राहणार

### पर्यायी मार्गाच्या वापराने पर्यटक वैतागले

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

पावसाळा जवळ आल्याने वरंध घाटातील कामे पूर्ण करणे गरजेचे आहे. यासाठी १५ ते ३१ मे या कालावधी हा मार्ग सर्व वाहतुकीस बंद केला आहे. प्रवाशांना पुन्हा ताम्हिणी अथवा महाबळेश्वरमार्गे पुणे असा लांबचा पल्ला गाठावा लागणार असून, ही प्रवाशांसाठी खर्चिक बाब ठरणार आहे. अधिकचा वळसा पडत असल्याने वाहन चालक आणि पर्यटक मात्र चांगलेच वैतागले आहेत.

पावसाळ्यात होणाऱ्या अतिवृष्टीत मोठ्या प्रमाणात दरड कोसळून दगड मातीचे ढिगारे रस्त्यावर येतात. त्याचप्रमाणे रस्ते व संरक्षक भिंती त्यामध्ये वाहून जातात. त्यामुळे भोरमार्गे पुणे जाणारा मार्ग गेल्या दोन-तीन वर्षांपासून पावसाळ्यात बंद ठेवण्यात येत आहे. या मार्गाच्या मजबुतीकरणाचे काम दोन वर्षांपासून सुरु आहे. गेल्यावर्षी राजेवाडी फाटा ते भोरमार्गे पुणे या रस्त्याला केंद्रीय



पान २ वर

## विश्वास नांगरे पाटील यांच्या नावाने ४० लाखांचा गंडा

### अलिबागमधील गोंधळपाडा येथील घटना

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

आधारकार्डचा गैरवापर झाल्याची बतावणी करून अलिबागमधील गोंधळपाडा येथील एका महिलेला विश्वास नांगरे पाटील यांच्या नावाने ४० लाख रुपयांचा गंडा घातल्याचा प्रकार समोर आला आहे. शनिवारी (दि. ४) रात्री मोबाईलवर कॉल करून ही फसवणूक करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

फिर्यादी महिला तिच्या घरात असताना अचानक रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास व्हॉट्सअॅप कॉल अज्ञाताने केला. टेलिकॉम रेग्युलेटरी ॲथोरेटी ऑफ इंडियामधून बोलत असल्याचे सांगून तुमच्या आधारकार्डचा गैरवापर झाला आहे. मोबाईल फोन बंद होणार आहे, असे त्याने सांगितले. त्यानंतर त्याच नंबरवर पोलीस अधिकारी दीक्षित मॅडम आणि विश्वास नांगरे पाटील बोलत असल्याचे सांगत तिचा विश्वास संपादन केला. तुमच्यावर विविध स्वरूपाचे गुन्हे दाखल असून, ईडी आर.बी.आय, मुंबई पोलीस यांच्याकडील गुन्ह्यात अटक वॉरंट असल्याची भीती निर्माण केली. ईडी व इतर यंत्रणेच्या भीतीने ती महिला बोलकी झाली. जाळ्यात अडकल्याचे लक्षात आल्यावर त्यांनी त्या महिलेचे बँकेतील सर्व माहिती घेऊन तिच्या बँक खात्यातून परस्पर ऑनलाईन ४० लाख ७३ हजार ७१९ रुपये गायब केले.

पान २ वर

## कार-रिक्षाचा भीषण अपघात

### रिक्षा चालकासह तिघे जखमी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग-रोहा मार्गावर शनिवारी सकाळी कार आणि रिक्षाची समोरासमोर धडक झाली. त्यामध्ये दोन्ही वाहनांचे नुकसान झाले असून, रिक्षा चालकासह तिघेजण जखमी झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. ही घटना पुतूबाईचा पाडा स्थानकापासून काही अंतरावर घडली. मुंबई येथून रोहाकडे कार घेऊन चालक जात होता. शनिवारी सकाळी नऊ ते दहा वाजण्याच्या सुमारास पुतूबाईचा पाडानजीक कार आली. अचानक कारचा टायर फुटला. त्यामुळे चालकाचा गाडीवरील ताबा सुटून समोरून येणाऱ्या रिक्षा आणि कारची एकमेकांना धडक

पान २ वर

## राज्याभिषेक सोहळ्याची पूर्वतयारी

**। रायगड । खास प्रतिनिधी।**

रायगड किल्ल्यावर तारखेनुसार ६ जून व तिथीनुसार २० जून रोजी शिवराज्याभिषेक सोहळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. मागील वर्षी शिवराज्याभिषेक सोहळ्याला साडेतीनशे वर्षे पूर्ण झाली होती. त्यामुळे कार्यक्रमाला शिवप्रेमी नागरिकांची लाखोंच्या संख्येने उपस्थिती होती. त्यामुळे नियोजन करताना सरकारी यंत्रणांवर प्रचंड ताण आला होता. त्यामुळे यंदा जिल्हा प्रशासन अधिक सर्तक झाले आहे. त्याच अनुषंगाने जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी बैठक घेत संबंधित विभागांनी सूक्ष्म नियोजन करावे, असे निर्देश दिले.

रायगड किल्ला येथे शिवराज्याभिषेक सोहळा २०२४ च्या अनुषंगाने नियोजन बैठक संपन्न झाली. यावेळी जिल्हाधिकारी जावळे बोलत होते. शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी राज्यातील विविध जिल्ह्यांतून मोठ्या संख्येने शिवप्रेमी नागरिक रायगड येथे येत असतात. यावर्षी होणाऱ्या कार्यक्रमांसाठी आयोजकांकडून तयारी केली जात आहे. मागील वर्षी १५ हजार व्यक्तींची क्षमता असलेल्या गडावर अडीच लाखांपेक्षा जास्त शिवप्रेमी आल्यामुळे सुरक्षा व पायाभूत सुविधांवर मोठा ताण निमर्ण झाला होता. हा अनुभव लक्षात घेऊन यावर्षी कोणतीही समस्या उद्‌भवू नये या दृष्टीने आवश्यक त्या सुविधा निर्माण करण्यासाठी पूर्वतयारी केली



- **जिल्हाधिकारी जावळे यांनी दिले सूक्ष्म नियोजनाचे निर्देश**

पान २ वर




## माथेरानच्या राणीला मिळणार नवा लूक

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

जागतिक पर्यटन स्थळ असलेल्या माथेरानची राणी पर्यटकांचे आकर्षण आहे. या मिनिट्रेनला मध्य रेल्वेकडून लवकर आकर्षक असे नवीन स्वरूपात कोळशाच्या इंजिनचा लूक असलेले डिझेलवर चालणारे नवीन इंजिन मिळणार आहे. नवा लूक असलेल्या या इंजिनच्या गाडीतून प्रवास करणे म्हणजे पर्यटकांना एक पर्वणीच म्हणावी लागेल.

सुमारे सत्तर वर्षांपूर्वी मध्य रेल्वेने माथेरानच्या गाडीच्या ताफ्यात नवीन कोळशावर चालणारी स्टीम इंजिन बनवली. माथेरानचे आकर्षण असणारी ही कोळशावर चालणारी स्टीम इंजिन घाटातून जाताना अनेक ठिकाणी कोळशाच्या ठिणग्या उडून आजूबाजूचे गवत जळत असे, तर १९७७ आसपास या इंजिनातून निघालेल्या कोळशाच्या ठिणग्यांमुळे जुम्मापट्टीजवळ काही घरांना आग लागली होती. त्यानंतर हे इंजिन चालण्यावर आक्षेप घेण्यात आला. तर, इंजिनसाठी कोळसादेखील मिळेनासा झाला. यावर मध्य रेल्वेकडून २० सप्टेंबर १९८२ साली माथेरानसह महाराष्ट्रातील वाफेवर चालणारी इंजिन्स बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला.

या इंजिनाची येणाऱ्या पर्यटकांना ओळख राहावी याकरिता जुने वाफेचे इंजिन माथेरान येथे

पान २ वर

### कोळशाच्या इंजिनप्रमाणेच नवे डिझेल इंजिन



● (छायाचित्र : संजय गायकवाड)






# ४ जूनला देश मोदीमुक्त होणार!

## ■ मुंबईतील सभेत इंडिया आघाडीचा निर्धार

। मुंबई । प्रतिनिधी ।

दिल्लीचे तख्त काबीज करण्यासाठी महाराष्ट्राने वज्रमूठ आवळली आहे. 'इंडिया' आघाडीच्या भक्कम एकजुटीचे विराट रूप आज मुंबईत पाहायला मिळाले. महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या आणि शेवटच्या टप्प्यातील प्रचार तोफा उद्या थंडावत आहेत. त्याआधी महाविकास आघाडीची संयुक्त प्रचारसभा आज बीकेसीतील एमएमआरडीए मैदानावर झाली. या सभेला लाखोंचा जनसागर उसळला. याच जनसागराच्या साक्षीने मोदी सरकार आणि भाजपच्या हुकूमशाहीविरुद्ध वज्राघात करण्यात आला. हुकूमशहाच्या व्हायरसपासून देशाला वाचवण्यासाठी हिंमत दाखवा आणि फक्त एका बोटाने या हुकूमशहाला गाडून टाका, अशी साद यावेळी महाराष्ट्रातील तमाम जनतेला घालण्यात आली तेव्हा 'हुकूमशहाला मोडीत काढणारच; ४ जूनला देश मोदीमुक्त होणारच, असा बुलंद नारा गर्दीतून घुमला. 'मोदी चले जाव, अब की बार भाजप तडीपार' असे ठणकावून सांगणारीच ही सभा होती.



महाविकास आघाडीच्या सर्व नेत्यांच्या साक्षीने विराट जनसमुदायाशी संवाद साधताना उद्धव ठाकरे म्हणाले, हुकूमशहाच्या व्हायरसपासून देशाला वाचवण्यासाठी हिंमत करून फक्त एका बोटाने या हुकूमशहाला गाडून टाका, आणि जिथे जिथे शिवसेनेची मशाल आहे ती मशाल यांच्या बुडाला अशी लावा की, पुन्हा हे महाराष्ट्रात येता कामा नयेत. जिथे काँग्रेसचा हात आहे तो हात यांच्यावर असा बसला पाहिजे, ते पुन्हा उठता कामा नयेत. आणि तुतारी अशी वाजली पाहिजे की, यांची भीतीने बोबडी वळली पाहिजे. एकजुटीने हुकूमशाहीविरुद्धचा लढा नुसता लढायचा नाही, तर तो जिंकायचा आहे. आणि तो जिंकणारच

नरेंद्र मोदी यांचा खतरनाक प्लॅन सुरू आहे. 'वन नेशन, वन लीडर' त्यांना हवे आहे. त्यामुळे एकाधिकारशाही, हुकूमशाहीने ते सर्व विरोधकांना जेलमध्ये टाकतील, असे दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल कडाडले. ७५ वर्षे वयाची अट सांगत मोदींनी आडवाणींसह ज्येष्ठ नेत्यांना बाजूला केले. पुढील वर्षी ७५ वर्षे झाल्यानंतर मोदी सत्ता सोडणार का, असा सवालही त्यांनी केला. दिल्लीत 'आप'चे सरकार आल्यानंतर आम्ही वीज, पाणी, शिक्षण, औषधोपचार मोफत दिले. आता हे सर्व बंद करण्याचा डाव मोदींचा असल्याचेही ते म्हणाले.

बाळासाहेब ठाकरे यांनी तुम्हाला संकटाच्या काळात वाचवले त्या बाळासाहेबांना तुम्ही विसरलात, त्यांचा पक्ष फोडलात, अशा शब्दांत राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी मोदींना सुनावले. बाळासाहेबांचे विचार पुढे घेऊन जाणाऱ्या उद्धव ठाकरे यांच्या पाठीशी शक्ती उभी केल्याशिवाय राहणार नाही, असे त्यांनी मोदींना ठणकावले.

### 'तर भाजपचे अस्तित्व राहणार नाही' : खरगे

**केंद्रीय यंत्रणांच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधकांना तुरुंगांत टाकण्याचे काम केले; पण देशात बांगलादेश आणि पाकिस्तानसारखी परिस्थिती होऊ देणार नाही. भाजप, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि नरेंद्र मोदींनी लाख प्रयत्न केले, राज्यघटना आम्ही बदलू देणार नाही. भाजपने तसे प्रयत्न केल्यास त्यांचे अस्तित्वच शिल्लक राहणार नाही, असा इशारा काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी शुक्रवारी दिला. 'सब का साथ, सब का विकास' म्हणणाऱ्या भाजपने 'सब का सत्यानाश' केला, अशी टीकाही त्यांनी या वेळी केली.**

### ..तोपर्यंत हा 'आत्मा' स्वस्थ बसणार नाही : पवार

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पदावरून हटविल्याशिवाय हा भटकता आत्मा स्वस्थ बसणार नाही, असे प्रत्युत्तर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी मोदींना दिले. लोकांचा सहभाग असलेल्या या निवडणुकीत भाजपचा पराभव अटळ असून, हुकूमशाहचा पराभव करून संविधान व लोकशाही वाचविण्याचा निर्धार इंडिया आघाडीच्या नेत्यांनी केला. महाराष्ट्रातील शेवटच्या टप्प्यातील निवडणुकीच्या निमित्ताने इंडिया आघाडीने जोरदार शक्तिप्रदर्शन केले. काही दिवसांपूर्वी भटकती आत्मा अशी मोदींनी पवारांवर टीका केली होता. त्याला पवारांनी प्रचाराच्या अखेरीस उत्तर दिले.**

---

**वे|ध|क**

## हितेंद्र ठाकूरांचा विचारेंना पाठिंबा

**ठाणे** : वसई-विरार या भागात मोठे अस्तित्व असलेल्या हितेंद्र ठाकूर यांच्या बहुजन विकास आघाडीने (बविआ) ठाणे लोकसभेसाठी इंडिया आघाडीचे उमेदवार राजन विचारे यांना दर्शविला आहे. बिनशर्त पाठिंब्याचे पत्र बविआ पक्षाचे ठाणे जिल्हा सचिव मयूर तोरणे यांनी राजन विचारे यांना दिले आहे. बविआने २०१७ मध्ये ठाणे महापालिका निवडणुकीत त्यांच्या पक्षाचे उमेदवार उभे केले होते. अनेक ठिकाणी त्यांना मतदान झाले होते. बविआ पक्षाचे बळ पालघर जिल्ह्यातील वसई-विरार, नालासोपारा पट्ट्यात अधिक आहे.

## नाशिकमध्ये राडा

**नाशिक** : नाशिक लोकसभा मतदारसंघात २० मे रोजी मतदान पार पडणार आहे. आज प्रचाराचा अखेरचा दिवस असून, महायुती आणि महाविकास आघाडीकडून नाशिकमध्ये जोरदार शक्तीप्रदर्शन केले जात आहे. आज महाविकास आघाडीच्या रॅलीदरम्यान शिवसेनेचे दोन्ही गट आमनेसामने आल्यामुळे पोलिसांची धावपळ उडाली होती. रॅलीत महिलांची उपस्थिती लक्षणीय दिसून आली. ही रॅली सुरु असतानाच एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे पदाधिकारी आणि उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे पदाधिकारी आमनेसामने आले. त्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, पोलिसांच्या मध्यस्थीने वातावरण शांत झाले.

---

# तिसऱ्यांदा खासदार होणार

## ■ संजय जाधवांना आत्मविश्वास

। परभणी । वृत्तसंस्था ।

मध्यंतरी शिवसेनेमध्ये मोठ्या प्रमाणात फूट पडली पण आम्ही मूळ शिवसेनेसोबतच राहिलो. मूळ शिवसेनेसोबत राहिल्याचा आम्हाला प्रचंड अभिमान आहे आणि मूळ शिवसेनेत राहिल्यामुळेच मी आज तिसऱ्यांदा खासदार म्हणून निवडून येत आहे. जर मी शिवसेना सोडली असती तर मी मोठ्या फरकाने या लोकसभा निवडणुकीमध्ये हरलो असतो. तसेच मला परभणी लोकसभा मतदारसंघातून भाजपने मला तिकीटही मिळू दिलं नसतं, असा ठाम विश्वास परभणी लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार संजय जाधव यांनी व्यक्त केला आहे.



संजय जाधव यांनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत हे वक्तव्य केले आहे. परभणी लोकसभा मतदारसंघातील स्थितीचे वर्णन करत जाधव म्हणाले की, २०२४ ची परभणी लोकसभा निवडणूक अत्यंत वेगळी होती. कारण या निवडणुकीमध्ये चक्क ओबीसी विरुद्ध मराठा असे मताचे ध्रुवीकरण करण्यात आले. महादेव जानकर यांनी परभणी लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली त्याचा बेस काय? असा सवाल ही संजय जाधव यांनी उपस्थित केला. तसेच 'महादेव जानकर यांनी विकासाच्या मुद्द्यावर जर परभणी लोकसभा निवडणूक लढली असती तर त्यांचे डिपॉझिट ही जप्त झाले नसते. ओबीसी मराठा असे ध्रुवीकरण केल्यामुळे केवळ लाज राखण्यापुरते तरी मते जानकारांना पडतील, अशी अपेक्षा करतो, असेही संजय जाधव म्हणाले.

## राज ठाकरे मोदींच्या चरणी लीन : राऊत

**मुंबई** : राज ठाकरे नक्की कोणाच्या शाखांना भेट देणार? भाजपच्या की संघाच्या असा खोचक सवाल संजय राऊत यांनी राज ठाकरे यांना केला आहे. राज ठाकरेंच्या कुठे शाखा आहेत. राज ठाकरे मोदींच्या चरणी विलीन झालेले आहेत, अशी टीका त्यांनी केली. नरेंद्र मोदी हे पंतप्रधान व्हावे म्हणून राज ठाकरे यांनी लोकसभा निवडणुकीत भाजपला बिनशर्त पाठिंबा दिला. त्यानंतर मनसैनिकांनी अनेक ठिकाणी महायुतीचा प्रचार केला. अनेक मतदारसंघात मनसेने महायुतीच्या प्रचाराची धुरा सांभाळली. राज ठाकरे आणि नरेंद्र मोदी शुक्रवारी मुंबईतील शिवाजी पार्कवरील जाहीर सभेत एकाच मंचावर आले होते.

# बारामतीत युगेंद्र पवार सक्रिय

## ■ अजित पवारांचे टेन्शन वाढले

। बारामती । वृत्तसंस्था ।

बारामतीतील काका-पुतण्याचे बंड अवघ्या देशाने पाहिले. याच बंडाचा दुसरा अध्याय आता बारामतीत घडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. एकीकडे ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्याशी फारकत घेत पुतणे अजित पवार यांनी पक्ष मिळवला. त्याच अजित पवार यांचे पुतणे युगेंद्र पवार आता बारामतीत ॲक्टिव्ह झाले असून, आगामी विधानसभा निवडणुकीत आता अजित पवार व युगेंद्र पवार अशी काका-पुतण्याची लढाई बारामतीकरांना पाहायला मिळेल, अशी चिन्हे निर्माण झाली आहेत.

राष्ट्रवादीतील फुटीनंतर अजित पवार, सुनेत्रा पवार व त्यांची



पार्थ व जय ही दोन मुले एकीकडे तर उर्वरित पवार कुटुंब एकीकडे अशी स्थिती बारामतीत पाहायला मिळाली. नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत येथे नणंद-भावजय असा सामना रंगला. त्यात दोन्ही पवारांकडून एकमेकांवर जोरदार आरोप-प्रत्यारोप करण्यात आले. अजित पवार यांनी शरद पवार, सुप्रिया सुळे, रोहित पवार, युगेंद्र पवार यांना लक्ष्य केले. दुसऱ्या बाजूनं आमदार रोहित पवार यांनी अजित पवार यांच्यावर थेट हल्ला चढवला. बारामतीचा विकास मीच केला, असे सांगणाऱ्या अजित पवार यांना युगेंद्र यांनी प्रत्युत्तर देत बारामतीत महत्त्वाच्या संस्था, एमआयडीसी शरद पवार यांच्यामुळे उभी राहिल्याचं सांगितलं. युगेंद्र यांचा कामाचा धडाका सुरु असून, आगामी विधानसभेसाठी शरद पवार गटाकडून जोरदार मोर्चेबांधणी केली जात आहे. दुसरीकडे अजित पवार गट ४ जूनच्या निकालाची वाट पाहात आहे. या निकालावरच अजित पवार गटाची पुढील व्यूहरचना अवलंबून असेल.

---

# बीडमध्ये बोगस मतदान; रोहित पवारांचा आरोप

। मुंबई । प्रतिनिधी ।

बीड लोकसभेसाठी मतदान पार पडलं असले, तरी आरोपांच्या फैरी अजूनही झडत आहेत. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी दोन व्हिडिओ शेअर करत बोगस मतदानाचा आरोप केला आहे. दोन व्हिडिओ ट्विट करताना निवडणूक आयोगाला विचारणा केली आहे. निवडणूक आयोग चौकशी करणार आहे की फक्त विरोधकांवरच आचारसंहिता भंगाचे गुन्हे दाखल करण्यात धन्यता मानणार, अशी विचारणा त्यांनी केली आहे.

रोहित पवार यांनी ट्विट करत म्हटलं आहे की, भाजपकडून बीड लोकसभा मतदारसंघात विशेषतः परळी तालुक्यात अधिकाऱ्यांना धमकावून बोगस मतदान, मतदान केंद्रे ताब्यात घेणे असे गैरप्रकार करण्यात आले. सत्ताधाऱ्यांची ही दडपशाही रोखण्याची हिम्मत बबनभाऊ गीते यासारख्या अनेक सामाजिक कार्यकत्यांनी दाखवली. निवडणूक आयोग या प्रकरणांची निष्पक्ष चौकशी करणारे आहे की फक्त विरोधकांवर आचारसंहिता भंगाचे गुन्हे दाखल करण्यातच धन्यता मानणार आहे? असो, पण एकेकाळी महाराष्ट्राच्या राजकारणाला आदर्श घालून देणाऱ्या बीड जिल्ह्यात दडपशाहीचे हे प्रकार सत्ताधाऱ्यांना शोभत नाहीत, अशी टीकाही रोहित पवार यांनी केली.

## भाजपा पदाधिकाऱ्यांवरही गुन्हे दाखल

**पुणे** : पुणे लोकसभेच्या निवडणुकीचं मतदान पार पडलं आहे. याच मतदानाच्या दरम्यान भाजप आणि काँग्रेसकडून आंदोलनं करण्यात आली. त्यात दोन्ही पक्षाचे नेते आणि कार्यकर्ते आक्रमक झाल्याचं पाहायला मिळालं. त्यानंतर लोकसभेचे काँग्रेसचे उमेदवार रवींद्र धंगेकर आणि त्यांच्या कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल झाले होते. आता त्यांच्याविरोधात घोषणाबाजी करणाऱ्या भाजपच्या कार्यकर्त्यांवरदेखील आता गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. रवींद्र धंगेकर यांच्यानंतर भाजपच्या पदाधिकाऱ्यांवरही गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सहकार नगर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मोदी है तो मुमकिन है...

## अमोल कोल्हेंचा मोदींना उपरोधिक टोला

। धुळे । वृत्तसंस्था ।

मनमाड-इंदूर रेल्वेचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. त्यामुळे मी रेल्वेची वाट बघत थांबलो होतो. कारण 'मोदी है तो मुमकिन है'. त्यामुळे सभेला येण्यास उशीर झाला. म्हणून मी आपली दिलगिरी व्यक्त करतो, असा उपरोधिक टोला खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी भाजपला लगावला.

धुळे लोकसभा मतदारसंघातील इंडिया आघाडीच्या उमेदवार डॉ. शोभा बच्छाव यांच्या प्रचारार्थ शुक्रवारी सकाळी शहरातील इंदिरा गार्डन परिसरात सभा झाली. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष आमदार कुणाल पाटील, उमेदवार डॉ. शोभा बच्छाव, माजी आमदार सुधीर तांबे, अश्विनी पाटील, प्रतिभा शिंदे, माजी आमदार शरद पाटील, प्रथम महापौर भगवान करणकाळ, राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष रणजीत भोसले, डॉ. दरबारसिंग गिरासे, अनिल भामरे आदी उपस्थित होते. खासदार डॉ. कोल्हे पुढे म्हणाले, की अनेक ठिकाणी पंतप्रधानांकडे बघून मतदान करा, असे सांगितले जात आहे. पण सोयरीक जुळवताना बापाच्या कर्तृत्वाकडे नव्हे, तर मुलाकडे बघावं लागतं. तुम्ही पंतप्रधान नव्हे तर, खासदार निवडत असल्याची आठवण डॉ. कोल्हे यांनी यावेळी करून दिली. काँग्रेसच्या काळात देशावर ५४ लाख कोटी रुपयांचा कर्ज होतं. पण भाजपच्या मागील दहा वर्षांच्या कार्यकाळात हे कर्ज २०५ लाख कोटी झाले आहे. मतदानाच्या पाच मिनिटांत देशाची पुढील सत्ता, पाच वर्षे कोणाच्या हाती ते ठरणार आहे. या पाच मिनिटांत वाढलेले सिलिंडरचे भाव आठवावे. चिरडलेले शेतकरी आंदोलन, महिला कुस्तीपटूंना रस्त्यावरून फरपटत नेणे, तसेच मणिपूरची घटना आठवावी, असे म्हणत डॉ. कोल्हे यांनी डॉ. शोभा बच्छाव यांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन यावेळी केले.



### दरडोई उत्पन्नावर मोदींनी बोलावे

**पंतप्रधान अर्थव्यवस्थेवर बोलतात, पण दरडोई उत्पन्नावर बोलत नाही. जनतेच्या डोळ्यात धूळफेक होत आहे. मात्र आता जनतेच्या लक्षात येऊ लागल्यानंतर पंतप्रधानांची भाषा बदलली आहे. ते धार्मिक तेढ करणारी भाषणे करत आहेत. पोटातल्या आगीला धर्माची भाषा ठाऊक नसते. श्रीरामावर आमचीही श्रद्धा आहे. पण पोकळ घोषणांचा उपयोग काय, असा सवालही डॉ. कोल्हे यांनी भाजपला विचारला.**

---

पान १ वरुन

## विजय निश्चित

पाचव्या टप्प्यातील प्रचाराच्या तोफा थंडावल्या असून, सोमवारी २० मे रोजी प्रत्यक्षात मतदान होणार आहे. दरम्यान, शनिवारी इंडिया आघाडीकडून पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या पत्रकार परिषदेत इंडिया आघाडीकडून विजयाचा विश्वास व्यक्त करण्यात आला. या पत्रकार परिषदेला मल्लिकार्जुन खरगेंसह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे यांच्यासह महाविकास आघाडीचे बडे नेते हजर होते. यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना खरगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार हल्ला चढवला.

मल्लिकार्जुन खरगे म्हणाले की, महाराष्ट्रात विश्वासघात करुन बेकायदा सरकार अस्तित्वात आले. त्याचे समर्थन पंतप्रधान नरेंद्र मोदी करतात. एवढेच नाही तर समाजात दुही माजवण्याची भाषाही ते करतात. आपले विचार चुकीच्या पद्धतीने मांडून लोकांना भडकवण्याचे काम आजवर कोणत्याही पंतप्रधानाने केले नाही.

## आठवडा बाजाराच्या जागेवर अतिक्रमण

पंच कमिटीने तहसीलदार यांच्याकडे अर्ज केला होता. त्याबाबत प्रशासनाने मागणीची दखल घेत कार्यवाहीदेखील सुरु केली. भूमीअभिलेख विभागामार्फत जमिनीची मोजणीसुद्धा करण्यात आली.

मात्र, आठवडा बाजारासाठी प्रस्तावित असलेल्या या जागेत एका धनदांडग्याने बांधकाम सुरु केले. मातीचा भराव टाकण्यात आला. आठवडा बाजाराच्या जागेत सुरु असलेल्या बांधकाम व भरावाविरोधात कुर्डूस येथील ग्रामस्थ एकवटले. गावांच्या हितासाठी होणाऱ्या प्रकल्पाऐवजी बेकायदेशीररित्या सुरू असलेल्या बांधकाम व भरावाविरोधात पंच कमिटीचे पदाधिकारी प्रभाकर पिंगळे, सुनील पिंगळे आदी ग्रामस्थांनी अलिबाग तहसीलदार यांच्याकडे लेखी तक्रार केली. मात्र, ग्रामस्थांच्या मागणीकडे दुर्लक्ष करून धनदांडग्यांना अभय दिला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. या बांधकामाबाबत प्रशासन योग्य ती कार्यवाही करेल का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

नकाशाच्या दुरुस्तीमध्ये अफरातफर

कुर्डूस येथील गट नं. ३३२ मधील शासकीय जागेतील नकाशाची दुरुस्ती भूमीअभिलेख कार्यालयात करण्यात आली. मात्र, या नकाशाच्या दुरुस्तीमध्ये अफरातफर करण्यात आली असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. ३३२ ऐवजी गट नं. ५ टाकण्यात आले आहे. त्यामुळे नकाशाच्या दुरुस्तीमध्ये प्रशासनाकडून अफरातफर झाल्याचा आरोप करण्यात येत आहे.

**कुर्डूस गावातील प्रस्तावित आठवडा बाजारासाठी जागेची मागणी करण्यात आली. त्यानुसार आम्हाला मदत प्रशासनाकडून झाली. मात्र, या जागेत म्हात्रे नामक व्यक्तीने बांधकाम व भराव सुरु केले आहे. त्याबाबत तहसीलदार यांच्याकडे तक्रार केली. परंतु, त्यांच्याकडून ठोस कारवाई करण्यात आली नाही. गावाच्या विकासाला अधिकाऱ्यांकडून आडकाठी येत आहे. निवडणुकीचे कारण सांगून त्याकडे दुर्लक्ष होताना दिसून येत आहे. - प्रभाकर पिंगळे, अध्यक्ष, ग्राम पंचायत कमिटी**

## वरंध घाट ३१ मेपर्यंत बंद राहणार

रस्ते व वाहतूक मंत्रालयाने राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा दिला आहे. हा दुपदरी रस्ता काँक्रिटचा करण्यात येत आहे. सद्यःस्थितीत वरंध गाव ते रायगड जिल्हा हद्दीमध्ये संरक्षक भिंतीचे काम प्रगतीत असून, बहुतांश काम पूर्ण झाले आहे. परंतु, पारमाचीवाडी ते रायगड जिल्हा हद्द या ठिकाणचे काम अपूर्ण आहे. येथे काम करताना अपघात होण्याची दाट शक्यता आहे. तसेच पावसाळ्यापूर्वी रस्त्याचे काम पूर्ण करणे शक्य होणार नाही. यासंदर्भातील अभिप्राय जिल्हाधिकारी रायगड यांनी पोलीस प्रशासन व राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे मागवले होते.

त्यानंतर काही दिवसासाठी या मार्गावरील वाहतूक बंद करण्यात आली होती. मात्र, एप्रिल-मे महिन्यातील लग्नसराईत पुण्याकडील लोकांना कोकणात येण्यासाठी पडणारा वळसा विचारात घेता या मार्गावरील वाहतुक काही दिवसांसाठी पुन्हा सुरु केली गेली होती. पावसाला सुरुवात होण्याआधी कामाचा निपटारा होणे गरजेचे आहे. यासाठी १५ मेपासून हा मार्ग सर्व वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे.

वरंध घाटात काम सुरु करण्यात आल्याने आता अधिकचा वळसा घालावा लागत आहे. त्यामुळे इंधनाच्या खर्चात आणि वेळेत वाढ झाली आहे. आधी माहिती असते तर हा मार्ग निवडला नसता, असे पर्यटकाने सांगितले.

## १ जूनपासून मासेमारीवर बंदी

स्पष्ट केले आहे.

भारताच्या पूर्व किनारपट्टीवर मान्सूनचे आगमन लवकर होत असल्यामुळे या किनारपट्टीवर मासेमारी बंदी कालावधी १५ एप्रिल ते १४ जून तसेच पश्चिम किनारपट्टीवर मान्सूनचे आगमन उशिरा होत असल्यामुळे पश्चिम किनारपट्टीवर मासेमारी बंदी कालावधी १ जून ते ३१ जुलै २०२४ असा आहे. या कालावधीत पावसाळी मासेमारी बंदी करण्यात आली आहे. या कालावधीत मासळीच्या जीवांना प्रजोत्पादनास पोषक वातावरण असते. या कालावधीत मासेमारी बंदीमुळे मासळीच्या बीजनिर्मिती प्रक्रियेला वाव मिळून मासळीच्या साठ्याचे जतन होते. तसेच या कालावधीत खराब व वादळी हवामानामुळे होणारी मच्छिमारांची जीवित व वित्तहानी मासेमारी बंदीमुळे टाळता येणे शक्य होते. ही बंदी यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौकांना लागू राहणार आहे. समुद्रात मासेमारीसाठी गेलेल्या सर्व यांत्रिक व यंत्रचलित मासेमारी नौका १ जूनपूर्वी बंदरात परतणे बंधनकारक आहे; तसेच ३१ जुलैपूर्वी समुद्रात मासेमारीसाठी कोणालाही जाता येणार नाही, असे मत्स्य विभागाकडून जाहीर करण्यात आले आहे.

## कार-रिक्षाचा भीषण अपघात

लागली. या धडकेत कार रस्त्याच्या बाहेर शेतामध्ये पलटी झाली. सुदैवाने मोठी जीवितहानी टळली. जखमींना अलिबागमधील दवाखान्यात दाखल केल्याची माहिती समोर येत आहे.

## विश्वास नांगरे पाटील यांच्या नावाने ४० लाखांचा गंडा

फसवणूक झाल्याचे लक्षात येण्यापूर्वी चोरट्यांनी ऑनलाईन फसवणूक करून आर्थिक लूट केली. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठण्यात अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## राज्याभिषेक सोहळ्याची पूर्वतयारी

जावी, असे निर्देश जावळे यांनी दिले. येणाऱ्या नागरिकांच्या वाहनांचे पार्किंग, पिण्याचे पाणी, आरोग्य, स्वच्छता तसेच या कालावधीत आवश्यक असणाऱ्या विविध सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी सूक्ष्म नियोजन करून कार्यवाही करावी, असे त्यांनी सूचित केले. महाड व माणगावमार्गे येणाऱ्या खासगी वाहनांच्या वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी रस्त्यांची कामे, पार्किंगच्या जागा व तेथून गडाकडे जाणाऱ्या मार्गाची व्यवस्था संबंधित विभागांनी पूर्ण करावे. तसेच, आवश्यक ती माहिती देणारे फलक लावले जावेत, असे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी सांगितले. तत्पूर्वी, जावळे आणि उपस्थित सर्व अधिकारी यांनी रायगड किल्ल्याची पाहणी केली. तसेच आवश्यक तयारीच्या अनुषंगाने त्यांनी संबंधित यंत्रणांना निर्देश दिले. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बस्तेवाड, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता एन.आर. नामदे, राष्ट्रीय महामार्गाचे कार्यकारी अभियंता दिलीप चौरे, पोलीस उपअधीक्षक एस.बी. काळे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. आंबादास देवमाने, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी महेश देवकाते यांच्यासह विविध शासकीय विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

## माथेरानच्या राणीला मिळणार नवा लूक

ठेवण्यात आले; परंतु अशाच प्रकारे नवीन स्वरूपात इंजिन असावे याकरिता मध्य रेल्वेकडे विचारणा होऊ लागली. यावर मध्य रेल्वेकडून यावर विचार करून नवीन स्वरूपात डिझेलवर चालणाऱ्या मात्र वाफेच्या इंजिनाचा लूक असलेल्या इंजिनची निर्मिती परळ लोके शेडमध्ये केली असून, साधारण जून महिन्यात हे इंजिन माथेरान रेल्वेच्या ताफ्यात दाखल होईल, अशी माहिती रेल्वे सूत्रांकडून देण्यात आली. या इंजिनाची रचना वाफेच्या इंजिनसारखी असून, यातून शिट्टीदेखील वाफेवर वाजणारी फुसफुसणारी असेल, तर या इंजिनाला हेरिटेज लूक देण्यात आला असून, यापासून पर्यावरणास कुठलीही बाधा होणार नाही. हे इंजिन परळ लोकेशेडमध्ये असून, ते लवकरच रस्तामार्गे नेरळ येथे आणून त्याची जोडणी केली जाणार आहे. हे इंजिन पूर्णपणे सुरक्षित आहे, तर माथेरानचर घाट पूर्ण क्षमतेने चढेल, असेही रेल्वेकडून स्पष्ट करण्यात आले.

## पुण्यात होर्डिंग कोसळलं

**पुणे** : मुंबईतील घाटकोपर दुर्घटनेनंतर पुण्यातही होर्डिंग कोसळल्याची घटना घडली होती. या घटनेनंतर पुणे महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी अनधिकृत होर्डिंग्ज पुढील ७ दिवसांत काढून टाकण्याचे आदेश दिले आहेत. तसेच जे कारवाई करणार नाहीत त्यांना परिणाम भोगावे लागतील, असा सज्जड दमदेखील त्यांनी अधिकाऱ्यांना दिलाय. महापालिका आयुक्त यांनी स्वतः पुण्यातील रस्त्यावर फिरून या होर्डिंगजचा आढावा घेतला आहे. त्यातच, आज आणखी एक होर्डिंग कोसळल्याची घटना पुण्यात घडली आहे. राज्यातील काही भागात आज पुन्हा मुसळधार पाऊस पडला असून, विदर्भातील अकोला, कोकणातील सिंधुदुर्गातही पावसाने हजेरी लावली होती. सिंधुदुर्गात वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस कोसळला आहे. पुणे सोलापूर रोडवरील गुलमोहर लॉन्स येथे ही घटना घडली असून टोलनाक्या शेजारी उभारलेलं मोठं होर्डिंग मुसळधार पावसामुळे कोसळलं आहे. या होर्डिंगशेजारी बँड पथक उभे होते, अचानक वादळी वाऱ्यासह कोसळणाऱ्या पावसात हे होर्डींग बँड पथकावर पडल्यामुळे बँड पथकाचे नुकसान झाले आहे. तर, बँड पथकातील होर्डिंगखाली अडकून गंभीर जखमी झाल्याची घटना घडली.

# सोलनपाडा पाझर तलाव आटले

## कोट्यवधी खर्चूनही पाण्याची गळती । कामाची चौकशी करण्याची मागणी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**कर्जत तालुक्यातील सोलनपाडा जामरुंग येथील पाझर तलावामधील पाण्याने तळ गाठला आहे. तलावाच्या भिंतींमधून पाण्याची गळती पाझर तलाव बांधण्यापासून कायम आहे. त्यामुळे पाझर तलाव आटले असल्याने तेथील नळपाणी योजना कोलमडून पडल्या आहेत. दरम्यान, पाण्याची गळती रोखण्यासाठी तब्बल ६ कोटी खर्चूनही पाण्याची गळती सुरुच असल्याने त्या कामाची चौकशी करण्याची मागणी स्थानिक शेतकरी आणि ग्रामस्थ करीत आहेत. तसेच, याच परिसरातील काम तपाडा-सराईवाडी भागात प्रस्तावित लघुपाटबंधारे प्रकल्पांचे काम शासनाने पूर्ण करावे, अशी मागणी स्थानिक शेतकऱ्यांची आहे.**



१९७५ मध्ये रायगड जिल्हा परिषदेच्या लघु पाटबंधारे विभागाकडून सोलनपाडा गावाच्या वरच्या भागात जामरूग पाझर तलावाची १२ लाखांत बांधणी करण्यात आली होती. त्यानंतर या पाझर तलावाचे पाणी तेथील नदीमध्ये सोडण्यात येऊ लागले. परिणामी उन्हाळ्यात कोरड्या राहणाऱ्या नदीमध्ये पाणी वाहू लागले आणि पाण्याची टंचाई कमी झाली. तसेच, सोलन पाडा गावापासून सूगवे या भागात नदीच्या बाजूला विहिरी खोदून नळपाणीयोजना राबविण्यात येत आहे.

मात्र, २०१० पासून या भागातील जनतेकडून पाझर तलावाच्या भिंतींमधून पाण्याची गळती सुरु असल्याच्या तक्रारी होत्या. त्याच काळात सोलन पाडा गावापासून काही अंतरावर असलेल्या डोंगरपाडा येथील पाझर तलाव फुटला होता. २०१२ मध्ये या तलावाच्या दुरुस्तीसाठी पाच कोटी खर्च करत नव्याने भिंती बांधण्यात आल्या.

तरीदेखील पाण्याची गळती सुरूच राहिल्याने २०२२ मध्ये हे पाणी अडविण्यासाठी सहा कोटींचा निधी खर्च करण्यात आला. मात्र, तरीदेखील या तलावाची गळती सुरूच राहिली आणि आज पाझर तलावातील पाण्याने तळ गाठला.

सोलनपाडा पाझर तलावातील पाण्याची गळती मागील दोन वर्षात सहा कोटी खर्चून देखील सुटत नाही. यावर्षी मे महिन्याच्या सुरवातीलाच तलावातील पाण्याने तळ गाठला आहे. त्यामुळे पाझर तलावातून पाझरून जाणारे पाणी वाहून जात असते. त्या पाण्यावर सोलन पाड्याच्या खाली असलेल्या नाल्यावर टेंभरे, रजपे, डुक्कर पाडा, कामत पाडा, सोलन पाडा, हिरेवाडी, ठोंबर वाडी, जामरंग, आंबिवली, किकवी, शिलारवाडी या गावांच्या नळपाणी योजना तयार करण्यात अल्या आहेत. त्यामुळे नदीमधून वाहत जाणाऱ्या पाण्यावर अवलंबून असलेल्या १२ गावांच्या नळपाणी योजना कोलमडून गेल्या आहेत.

# रणरणत्या उन्हात शेतीच्या कामाला वेग

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

काही दिवसांमध्ये पावसाला सुरूवात होणार असून त्यासाठी पावसाळी हंगामातील पिकांच्या तयारीसाठी खालापूर तालुक्यातील शेतकऱ्यांकडून शेतीच्या मशागतीच्या कामाला सुरुवात करण्यात आली. नांगरणी, कोळपणीसह अन्य कामांची शेतकऱ्यांकडून जय्यत तयारी सुरू आहे. गेल्या वर्षी बळीराजा मोठ्या आर्थिक संकटात सापडलेला होता. त्यामुळे यंदा काय होणार, याची सर्वांना आस लागली आहे. काही दिवसातच या पावसास सुरूवात होणार असून या हंगामाच्या पिकाच्या तयारीसाठी शेतांची नांगरणी खुरपणी, बांधावरील गवत पेटवणे, शेणखत शेतात पसरवणे, जमिन भुसभुशीत करणे अशी विविध कामे सुरू आहेत. तर पावसाच्या तोंडावर शेतकऱ्यांच्या शेतीची मशागत करण्यामध्ये वेग वाढला आहे. यंदा येणाऱ्या पाऊसाचे रुप कसे असणार, याकडे सर्व शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे.





# कोळी बांधवांवर दुष्काळाचे सावट

## वेळेआधीच बोटी किनाऱ्यावर

**। मुरुड-जंजिरा । प्रतिनिधी ।**

कोकणातील मच्छिमार गेली १० वर्षे सतत अवकाळी पाऊस, वादळीवारा, समुद्रात रासायनिक प्रदूषण व अनधिकृत एलइडी मासेमारीमुळे दुष्काळाला समोरा जात आहे. खरंतर कोळी बांधवांचे जीवन सतत धोक्याचे बनत चालले आहे. प्रदूषणाचा धोका मोठ्या प्रमाणावर वाढल्यामुळे माशांचे उत्पादन कमी झाले आहे. तसेच, कारखान्यांतील विषारी वायू थेट नदीत सोडले जातात आणि हेच पाणी समुद्रामध्ये येऊन मिसळले जाते. त्यामुळे माश्यांवर विपरीत परिणाम होऊन दुष्काळ निर्माण झाला आहे. त्यामुळे दिवसेंदिवस मासेमारीचा खर्च वाढत चालला असून उत्पन्नात घट होउ लागली आहे. त्यामुळेच नाईलाजाने यावर्षी मुरुड परिसरातील कोळी बांधवानी वेळेआधीच आपल्या बोटी किनारी नांगरुन ठेवल्या आहेत.

# पंचायतन मंदिराचा वर्धापनदिन साजरा



**। पनवेल । वार्ताहर ।**

चौक परिसरातील जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल ट्रस्टचे नढाळ येथील श्री क्षेत्र पंचायतन मंदिर हे अतिशय प्रसिद्ध, नावाजलेले आणि पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र आहे. याठिकाणी दररोज असंख्य लोकं भेट देत असतात. अशा या प्रसिद्ध पंचायतन मंदिराचा दुसरा वर्धापनदिन सोहळा सोमवारी (दि.१३) पार पडला. अतिशय उत्साहात पंचायतन मंदिराचा दुसरा वर्धापन दिन साजरा झाला.

यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन ट्रस्टचे अध्यक्ष प्रितम म्हात्रे यांच्या नेतृत्वात करण्यात आले होते. मंदिरात पहाटे सहा वाजता काकड आरती व सर्व देवीदेवतांचे अभिषेक, पूजन, दुपारी भजन, सायंकाळी पालखी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. यानंतर लांबे महाराजांचे कीर्तन झाले. परिसरातील सर्व भाविकांनी दर्शनाला गर्दी केली होती. तसेच, यावेळी प्रीतम म्हात्रे भाविकांशी संवाद साधत होते.

## नववे पुण्यस्मरण



**कै.सौ. सुनिता चंद्रकांत शेट**

जन्म दि. ३१-०७-१९५९ देवाज्ञा : १९-५-२०१५

तुझं असणं आमच्यासाठी सर्व काही होतं
ते आमच्या आयुष्यातील सुंदर पर्व होतं
आता सर्वकाही असल्याची जाणीव आहे
पण आई तू आमच्या आयुष्यामध्ये नाही
हीच आमच्यासाठी मोठी उणीव आहे

तुझ्या आत्म्यास चिरशांती लाभो
हिच ईश्वरचरणी प्रार्थना

-: शोकाकुल :-
चिन्मय, सारीका, हर्षाली, श्वेता






### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१९ मे

१) श्री.गजेंद्र तुकाराम दळी
अलिबाग, १९-५-१९३४

२)श्री.जगदिशचंद्र विजयसेन ताम्हाणे
चेंढरे-अलिबाग १९-५-१९४३

३)श्री.भास्कर वासुदेव भातखंडे
मु.नागाव, ता.अलिबाग १९-५-१९५३


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-**
८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



शैलीन चेतन शाह, कांदिवली, मुंबई



श्रीधर गणपत घोसाळकर, स्मरणार्थ

# पाणी टंचाई भागात पाण्याचे टँकर

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील पाणी टंचाईने यावर्षी भयानक रूप धारण केले आहे. त्यामुळे असंख्य वाड्या आणि गावांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी स्थानिकांना पायपीट करावी लागत आहे. त्यात अवकाळीमुळे वातावरणातील उष्मा वाढला असून पिण्याचे पाणी सर्वांना मिळावे म्हणून सुधाकर घारे फाऊंडेशन कडून पाण्याचे टँकर सुरू करण्यात आले आहेत.



कर्जत तालुक्यातील पोशीर ग्रातपंचायत मधील चार आदिवासी वाड्यांमध्ये पिण्याचे पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. तेथील नळपाणी योजना यांची मोटार बंद पडल्याने दाहीवलि तसेच हंबरपाडा येथून पाण्याचे स्थिती गंभीर झाली होती. तर, पोशीर ग्रममपंचायत मधील चार आदिवासी वाड्या या देखील पाण्याचे टंचाईने त्रस्त झाले आहेत. त्या ग्रामपंचायतीमधील चिंच वाडी, वाघ्याची वाडी येथील पाण्याचे टँकर सुरू करण्याची मागणी सुधाकर घारे यांच्याकडे केली असता पाणी टंचाई दूर करण्यासाठी सुधाकर घारे फाऊंडेशनच्यावतीने तत्काळ पाण्याचे टँकर सुरू केले आहेत.

## बेवारस वाहनांच्या मालकांचा शोध

**पनवेल :** तळोजा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बेवारस व अपघातग्रस्त ११ वाहनांच्या मालकांचा शोध घेण्याची मोहिम सुरू केली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने दुचाकी प्लॅटीना (एमएच-०३-एपी-१०५८), पल्सर (एम एच-४८-एम-४३२५), मॅस्ट्रो (एमएच-०६-बीएफ-६६९७), पॅशन प्रो (एमएच-४३-एव्ही-७३६४), ॲक्टीव्हा (एमएच-०३-सीझेड-३६८०), पल्सर (एमएच-०३-बीएफ-०१५३), पॅशन प्रो (एम एच-०६-यु-२०८५), एफझेड (एमएच-२९-व्हीएच-४०५०), नंबर नसलेली डोमीनार, शाईन व रिक्षा (एमएच-०५-झेड-७३३२) या गाडीच्या मालकांनी तळोजा पोलीस ठाणे दुरध्वनी ०२२-२७४१२३३३/९८९७७९७१७२, पोलीस निरीक्षक रमेश जाधव ९८२१५५९२६६, हवालदार निवळे ९०८२१२५१४१ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन वपोनि अविनाश काळदाते यांनी केले आहे.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**-मुख्य संपादक**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## अनधिकृत जाहिरात फलकांवर कारवाई

**। पनवेल । वार्ताहर ।**

मुंबईमधील जाहिरत फलक दुर्घटनेनंतर पनवेल महापालिकेने देखील शहरातील अनधिकृत जाहिरत फलकांच्या विरोधात मोहिम सुरू केली आहे. गेल्या दोन दिवसापासून पालिका क्षेत्रातील सर्व जाहिरत फलकांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. यामध्ये कामोठेमध्ये २, कळंबोलीमध्ये ३, पनवेलमध्ये १, उपविभागीय नावडे येथे २७ अनधिकृत जाहीरत फलक आढळून आले आहेत. यामधील पाच अनधिकृत जाहिरत फलकांवरती आज निष्कासन महापालिकेच्यावतीने कारवाई करण्यात आली. मुंबईमधील जाहिरत फलक प्रकरणानंतर आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांनी महापालिका कार्यक्षेत्रातील अनधिकृत जाहिरत फलकांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानूसार आजपासून या अनधिकृत जाहिरत फलकांवरती कारवाई करण्यास सुरूवात करण्यात आली आहे.

## महावितरणला जनतेने सहकार्य करावे: काकड

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात अवकाळी पावसाने दमदार, वादळी वाऱ्यासह हजेरी लावल्याने वीज पुरवठ्याची वाताहात होऊन, तालुक्यात अनेक ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाला होता. बऱ्याच ठिकाणी उच्चदाब व लघुदाब वाहिनीचे पोल पडले होते, विद्युत रोहित्र निकामी झाले होते. अशाप्रसंगी महावितरण कर्जत तालुक्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम करून खंडित वीज पुरवठा पुर्ववत करण्याचे प्रयत्न करीत होते. सोमवारी झालेल्या पडझडीमुळे विस्कळीत झालेला वीज पुरवठा



पुर्ववत करण्यात येत होता आणि बहुतांशी भागाचा वीजपुरवठा पूर्वपदावर आला आहे. तसेच, या नैसर्गिक आपत्तीमुळे क्षतीग्रस्त वीजवाहिन्या, पोल, डीपी इत्यादी महावितरण तर्फे काम लवकरात लवकर करण्याचा अथक प्रयत्न चालू असून, वीजपुरवठा पुर्ववत करण्याचे कामे युध्दपातलीवर सुरु आहे. तरी, महावितरण भांडूप परिमंडलाचे मुख्य अभियंता सुनील काकडे यांनी कर्जत तालुक्यातील वीज ग्राहकांनी सहकार्य करावे, असे अहवान केले आहे.

## भरत पाटील यांना पत्नी शोक

**पनवेल :** शिवसेना उपजिल्हाप्रमुख व रास्त भाव धान्य दुकान व रॉकेल वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष भरत पाटील यांच्या पत्नी गुणाताई भरत पाटील यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.



भरत पाटील यांच्या पत्नी गुणाताई भरत पाटील (माजी सदस्य पंचायत समिती पनवेल) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या अंत्ययात्रेस शिवसेना (उबाठा)चे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माथेरानमधील प्रसिद्ध मलई कुल्फी

**। माथेरान । वार्ताहर ।**

प्रत्येक पर्यटनस्थळावर काहीना काही खासियत ही असतेच. त्याचप्रमाणे माथेरानमध्ये चिक्की, चपला व मधासोबतच मागील पाच दशकांपासून येथील मलई कुल्फी पर्यटकांच्या पसंतीस उतरलेली आहे. त्यामुळे कुल्फी खाण्याचा मोह येथील स्थानिकांसोबतच येणाऱ्या पर्यटकांना सुद्धा आवरता येत नाही.

जवळपास ५० वर्षांपेक्षा अधिक काळ माथेरानशी नाळ जुळलेले ज्ञानेश्वर तुकाराम रेणोसे प्रत्येक सुट्टयांच्या हंगामात माथेरानमध्ये येऊन आपला पूर्वापार चालत आलेला मलई कुल्फीचा व्यवसाय आपला बंधू दिनकर तुकाराम रेणोसे यांच्या



सोबत करत असतात. घरगुती पध्दतीने दुधापासून तसेच सीताफळ, स्ट्रॉबेरी, मलबेरी अशा विविध फळांच्या पल्प पासून तयार करण्यात आलेल्या कुल्फीला खूपच मागणी असते. आत्ता सध्या उन्हाळ्याच्या दिवसात मलई कुल्फी बरोबरच मँगो कुल्फीची सुद्धा अधिक मागणी असते. तसेच, थंडीच्या दिवसात देखील मलई कुल्फीला खूप मागणी असते. आजही त्यांनी बनविलेल्या कुल्फीची चव न्यारीच असल्याने पर्यटक समाधान व्यक्त करीत आहेत.

> आम्ही दररोज ताजा माल वापरतो. चांगल्या दर्जाच्या माव्यामुळे कुल्फी चविष्ट बनते. एकदा ही कुल्फी खाल्ली की त्यानंतर बऱ्याच वेळ कुल्फीची चव जिभेवर रेंगाळते. त्यामुळे आमची कुल्फी आवडीने विकत घेणारे अनेक ग्राहक आहेत. बालगोपाळांपासून वयोवृद्धांना कुल्फीची भुरळ पडते. मलई कुल्फी तर आमची खूप प्रसिद्ध आहे.
> **- तुकाराम रेणोसे, कुल्फी विक्रेते**

**क्लासिफाईड**
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण,** नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधील अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, कृष्णा शालिनी अपार्टमेंट पहिला मजला रूम नं.१०३, घरत आळी, एस.टी.स्टँडजवळ, अलिबाग/ रायगड
- **बोअरवेल-विहिरीसाठी** मशीनद्वारे अचूक भूजल संशोधन-९२२६७६६१२९
- **शुभमुहूर्त विवाह मंडळ अलिबाग** शाखेत सर्वजातीय वधूवरांची नावनोंदणी ४८ शाखा, वेबसाईट नोंदणीसाठी -९२२६७६६१२९
- **प्रथम, पुर्नविवाह, व्यंग,** सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- **शिवानी पेटशॉप अलिबाग येथे** कामाकरीता कमीत कमी १२ वी पास मुलगी पाहिजे ९२७२३८३४७६

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

## रस्त्यांची कामे पूर्ण करण्याची मागणी

**। कोर्लई । वार्ताहर ।**

साळाव-मुरुड-आगरदांडा रस्त्यावर यंदा डांबरीकरणाचे काम करण्यात आले असून या कामात काही ठिकाणी अर्धवट सोडून देण्यात आलेले काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्यात यावे, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) युवासेना रायगड उपजिल्हाप्रमुख परेश किल्लेकर यांनी केली आहे. साळाव-मुरुड-आगरदांडा रस्त्यावर यंदा करण्यात आलेल्या डांबरीकरण कामात नांदगाव, उसरोली फाटा, मजगांव विहूर भागात काही ठिकाणी हे काम अपूर्ण ठेवण्यात आले आहे. त्यामुळे पावसाळ्यात याठिकाणी खड्ड्यांचे प्रमाण वाढून याचा प्रवासी व वाहनचालकांना त्रास होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी यात लक्ष पुरवून या रस्त्यावरील उर्वरित डांबरीकरणाचे काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्यात यावे, अशी मागणी परेश किल्लेकर यांनी केली आहे.



## ४३ वर्षांनी माजी विद्यार्थी एकत्र



**। शिहू । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील सरखेल कान्होजी आंग्रे चिखली हायस्कूल येथिल माजी विद्यार्थी सन १९८०-८१ च्या दहावीच्या बॅचचा स्नेह मेळावा बुधवारी (दि.१५) संतोष रघुनाथ पाटील यांच्या अनुराघव फार्म सांबरी येथे संपन्न झाला. ज्ञान विज्ञान आणी सुसंस्कार या साठी शिक्षण प्रसार प. पूज्य बापूजी साळुंखे स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर अर्थात सरखेल कान्होजी आंग्रे हायस्कूल चिखली विद्यालयातील एकाच बाकावर बसलेले व पुढील आयुष्यामध्ये वेगवेगळ्या वाटेने गेलेले सवंगडी माजी विद्यार्थी स्नेह मेळाव्याच्या निमित्ताने ४३ वर्षांनी पुन्हा एकत्र आले होते. आनंद, आश्चर्य आणी कौतुक अशा संमिश्र भावना सवंगड्यांच्या चेहऱ्यावर दिसत होत्या.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे कामथ, ता. अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीच्या विद्यमान मालक पन्नालाल आगरचंद तापडीया यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|
| कामथ ता. अलिबाग | १९२/१ | जिरायत ०-२२-७० पो.ख. ०-०१-०० एकुण ० १३-७० | २.५६ |
| | १९२/२ | जिरायत ०-०५-०० पो.ख.०-००-५० एकुण ०-०५-५० | ०.९० |
| वर वर्णन जमिन मिळकत या नोटीसीचा विषय आहे. | | | |

सदरहू वर्णन केलेली मिळकत निबंध, बोजा रहीत असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापी सदर मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा, बारसाहक्क, मालकी, एम.ओ.यू. करार, तावेकब्जा वहिवाट, रस्ता बहीबाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गुहीत धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. २८/०५/२०२४
मोबा. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
मु. बुरूमखाण, पो.वरसोली
ता. अलिबाग, जि. रायगड

## जाहीर नोटीस

**समाजकल्याण अनुदानित विद्यार्थी वसतिगृह, कोतवालवाडी ट्रस्ट नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१**

कर्जत तालुक्यातील नेरळ येथील कोतवालवाडी ट्रस्ट या सेवाभावी संस्थेच्या हुतात्मा भाई कोतवाल आदिवासी विद्यार्थी वसतीगृहामध्ये आदिवासी मागास वर्गीय अ. जात ३८% अजमात ५७% वि.जा.भ.ज. ३% वि.मा.प्र. २% आणि इतर मागास अपंग व अल्प उत्पन्न गटातील विद्यार्थ्यांना सन २०२४- २०२५ या शैक्षणिक वर्षामध्ये प्रामुख्याने इयत्ता ५ वी ते ८ वी च्याच विद्यार्थ्यांनाच प्रवेश देण्यात येणार आहे.

तरी गरजू विद्यार्थ्यांनी आपले गुणपत्रक झेरॉक्स प्रत घेऊन दि.३१/०५/२०२४ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात सकाळी ११ ते ५ वाजेपर्यंत अर्ज आणून द्यावेत.

दिनांक ०३/०६/२०२४ रोजी सकाळी ११ ते २ या वेळेत प्रत्येक्ष मुलाखती घेतल्या जातील. व उतीर्ण विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल. उशिरा आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

संपर्क:
**कार्यालय: श्री. पुंडलीक कराळे**
**मो.न. ९२०९१४३७५२**
**अधिक्षक:**
**विश्वस्त: श्री. बाळकृष्ण पादीर**
**मो. न. ९८९२०३४०६६**

**श्रीम. संध्याताई देवस्थळे**
**मॅनेजिंग ट्रस्टी**
**मो. नं. ९८२२३३०८७८**
**श्री. सावळाराम जाधव**
**उप संचालक,**
**कोतवालवाडी स्ट्रस्ट**
**मो. नं. ९८२२९७०७०७**

# युद्ध शस्त्रकला प्रशिक्षण शिबीर



**। खांब । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील उडदवणे येथे काळभैरव मित्र मंडळ उडदवणे यांच्यावतीने शिवकालीन युद्ध शस्त्रकला प्रशिक्षण शिबीर मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आले. ऐतिहासिक वारसा लाभलेल्या या गावी काळाची गरज ओळखून १२ दिवसांसाठी या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात विविध शस्त्रांची माहिती व शिवकालीन युद्ध शस्त्रकला याबाबत तज्ञांकडून माहिती देण्यात आली. तसेच, प्रशिक्षण देण्यात आले. या कलेचा प्रशिक्षक विद्यार्थी वर्गाला भविष्यात निश्चितच फायदा होईल, असे मुख्य प्रशिक्षक अमित घरत यांनी याबाबत माहिती देताना सांगितले.

प्रशिक्षक अमित घरत यांनी प्रशिक्षणार्थी विद्यार्थी वर्गाला प्रशिक्षण शिबिराच्या माध्यमातून शिवकालीन युद्ध शस्त्रकला प्रशिक्षण दिल्याने प्रशिक्षणार्थींना शिवकालीन युद्ध शस्त्रकला याबाबत अधिक माहिती झाल्याने प्रशिक्षक अमित घरत यांचे उडदवणे ग्रामस्थ व काळभैरव मित्र मंडळ उडदवणे यांच्यावतीने त्यांचा विशेष असा सन्मान करण्यात आला.

## कारला ट्रेलरची धडक; दोघे जखमी

**पनवेल :** पनवेल जवळील जेएनपीटी ते पळस्पे रोडवर उभ्या स्वीफ्ट डिझायर गाडीला मागून येणाऱ्या ट्रेलरने जोरदार धडक दिली. या धडकेत दोघे जण जखमी झाल्याची घटना घडली आहे. महात्मा फुले कॉलेज समोरील रस्त्यावर नादुरुस्त स्वीफ्ट डिझायर गाडी (एमएच-१४-जेएल-९८८०) उभी असताना मागून येणाऱ्या (एमएच-४३-सीई-८६२०) ट्रेलरवरील चालकाने हयगयीने वाहन चालवून धडक दिली. या धडकेत ट्रेलर चालक काकासाहेब बोटे व स्वीफ्ट गाडीचा चालक रवींद्र मालवणकर हे दोघे जखमी झाले असून या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की मौजे शिर्कीचाळ, ता.पेण, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक अर्चना अंबाजी म्हात्रे व इतर यांच्याकडून रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे

| गाव | सर्व्हेनं./गट नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| शिर्कीचाळ | २५९ | ०.३८.६० पो.ख. ०.०६.३० एकूण क्षेत्र ०.४४.९० | ३.१२ |

वरील संपुर्ण क्षेत्र आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ०७ (सात) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

टिपः सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

सही/-
**ॲड हेमा ज. पाटील (घोडिंदे)**
साई श्रध्दा सबुरी बिल्डिंग बी-विंग,
ब्लॉक नं. ००२ प्रभु आळी, पेण

ठिकाण: पेण
दि.१९/०५/२०२४

ABHINAV JNYAN MANDIR SANSTHA'S
**ABHINAV JNYAN MANDIR**
ARTS, SCIENCE & COMMERCE COLLEGE, KARJAT - RAIGAD
AFFILITED TO MUMBAI UNIVERSITY

**ADVERTISEMENT**
**Un-Aided**

Application from eligible candidates are invited for the post of Assistant Professor for the Academic Year 2024-2025.

| Cadre | Subject | Total Post |
|---|---|---|
| Principal | - | 01 Full Time |
| Asst. Prof. | Economics | 02 Full Time |
| Asst. Prof. | History | 02 Full Time |
| Asst. Prof. | Politics | 02 Full Time |
| Asst. Prof. | English | 01 Full Time |
| Asst. Prof. | Marathi | 01 Part Time |
| Asst. Prof. | Commerce | 02 Full Time |
| Asst. Prof. | Accountancy | 02 Full Time |
| Asst. Prof. | BMS | 02 Full Time |
| Asst. Prof. | Chemistry | 03 Full Time |
| Asst. Prof. | Physicsi | 01 Full Time / 01 Part Time |
| Asst. Prof. | Mathematics | 01 Full Time |
| Asst. Prof. | Botany | 01 Part Time |
| Librarian | - | 01 Full Time |
| Lab Asst. | - | 01 Full Time |
| Clerk | - | 03 Full Time |
| Peon | - | 02 Full Time |

**Notice :** Educational qualification for the above posts will be as per U.G.C. / Mumabai University
Send application before 2 days on email id : ajmsrcollege@gmail.com Walk in interview on 01 June 2024 at 10.00 A.M.

Contact : 8007049479 / 8369667303 / 9209431888

**President / Secretory**
**AbhinavJnyanMandir Society,**
**Karjat–Raigad**

# कोलाड पाटबंधारेचा मनमानी कारभार

। कोलाड । वार्ताहर ।

**कोलाड पाटबंधारे विभागाकडून कुंडलिका सिंचनातून बारमाही वाहत असलेला उजवा तीर समजणाऱ्या कालव्यातून आरसीएफ कंपनीला मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात येत आहे. या पाण्यामुळे कालव्याला मोठ्या प्रमाणात गुरूळ पडल्यामुळे पाणीगळती होऊन हे पाणी राऊत बाग पुई येथे राहणाऱ्या विनायक सोसायटीच्या बंगल्याच्या चारही बाजूला शिरते. या पाण्याचा नागरिकांना नाहक त्रास होत आहे. याविषयी कोलाड पाटबंधारे खात्याच्या कार्यालयात वारंवार तक्रार करण्यात आली; परंतु पाटबंधारे खात्याचे दुर्लक्ष होत आहे. या पाण्याच्या गळतीमुळे होत असलेला नुकसानीला जबाबदार कोण, असा सवाल येथील ग्रामस्थांनी केला असून, संबंधित विभागाच्या कारभारावर संताप व्यक्त केला आहे.**



डोळवहाल बंधारा तसेच कुंडलिकेच्या सिंचानातून कोलाड पाटबंधारे तसेच जलसिंचन विभागामार्फत अनेक वर्षांपासून आरसीएफ कंपनीला पाणीपुरवठा केला जात आहे. परंतु कुंडलिका नदीच्या उजवा तीरावरील पाटबंधारे खात्याच्या याच कालव्याची डागडुजी अथवा दुरूस्ती अनेक वर्षांपासून केली गेली नाही, यामुळे ठिकठिकाणी कालव्याला गेलेले गुरूळ अथवा त्याला लागलेल्या गळतीमुळे अनेक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे, असा ग्रामस्थांचा आरोप आहे.

**||वारंवार तक्रार करून पाणीगळती बंद होईना**

**||नुकसानीला जबाबदार कोण? ग्रामस्थ आक्रमक**

गेली दहा ते बारा वर्षांपूर्वी या कालव्याच्या पाण्यावर रोहा तालुक्यातील शेकडो हेक्टर शेतजमीन भिजत होती. यात भाताचे पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जात होते. याशिवाय लोकांना पिण्यासाठी पाणीही मुबलक प्रमाणात मिळत होते. विहिरीही तळ गाठत नव्हत्या. गुरेढोरे यांच्या चारा व पाणी याचाही प्रश्न सुटत होता. आता परिस्थिती उलट झाली आहे. शेतकऱ्यांसाठी शेतीला पाणी नाही; परंतु धनदांडग्यांसाठी पाणी मुबलक हे व्यावसायिक धोरण पाटबंधारे खात्याने स्वीकारले आहे. त्यात कालव्यात कित्येक गुरुळ आणि त्याला लागलेली गळती या सांडपाण्यामुळे लगतचे शेतकरी आणि ग्रामस्थ नागरिकांचे मोठे नुकसान होत आहे. याबाबत अनेक निवेदन दिली, तक्रारी केल्या, मात्र यावर या खात्याचे अधिकारी कोणतीही ठोस उपाययोजना करण्यास तयार नाहीत. ते निष्क्रिय ठरत असल्याचे दिसून येत आहे, त्यामुळे या गळक्या पाण्याच्या नाहक त्रासामुळे आता येथील शेतकरी आणि ग्रामस्थ नागरिक अधिक आक्रमक झाले आहेत.

> **कुंडलिका सिंचनातून वाहणारा उजवा तीर कालवा अतिप्रमाणात पाणीगळतीमुळे राऊत बाग येथे राहणाऱ्या विनायक सोसायटीच्या बंगल्याच्या आजूबाजूला पाणीच पाणी होत आहे. याबाबत कोलाड पाटबंधारे खात्याकडे वारंवार तक्रार करून संबंधित अधिकारी दुर्लक्ष करीत आहेत.**
> **– गीता गौतम जाधव, तालुकाध्यक्षा, वंचित बहुजन आघाडी**

## आंबा बागायतीचे नुकसान

। नेरळ । प्रतिनिधी ।

अवकाळी पाऊस आणि वादळी वारे याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले आहे. त्यात नेरळ कशेळे रस्त्यावर असलेल्या नेवाळी येथे असलेल्या आंब्याच्या बागेचे मोठे नुकसान झाले आहे.

उल्हास नदीच्या तीरावर असलेल्या नेवाळी गावात शेतकऱ्यांनी आंब्याची बाग फुलविली आहे. त्या बागेत आंब्याची तसेच नारळ, चिकू यांची असंख्य झाडे आहेत. त्या बागेतील आंब्याला स्थानिक ग्राहकांकडून मोठी मागणी असते. केशर, हापूस या प्रकारचे आंब्याच्या झाडांचे वादळी वाऱ्याने मोठे नुकसान केले आहे. येथील ३०० आंब्याच्या झाडांवरील बहुसंख्य आंब्याची फळे जमिनीवर पडली आहेत. आंबे काढणीला आले असताना वादळी वाऱ्याने होत्याचे नव्हते



करून ठेवले आहे. शेतकऱ्याचे या बागेतील तर अनेक झाडे उन्मळून पडली आहे. वादळी वाऱ्याने तेथील शेतकरी भोईटे यांच्या फळ पीक बागेचे मोठे नुकसान झाले आहे. दरवर्षी भोईटे हे आपल्या बागेतून २५ एप्रिलनंतर आंब्याची काढणी करीत असतात. त्यानंतर साधारण एक हजार डझन आंब्याची विक्री करीत असतात.

# अवकाळीने वीटभट्ट्या उद्ध्वस्त

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील लाल माती आणि वीटभट्टीसाठी लागणारी माती असल्याने या मातीमधून तयार झालेल्या विटांना मोठी मागणी असते. त्यामुळे तालुक्याच्या प्रत्येक भागात वीटभट्टी व्यवसाय स्थानिक शेतकऱ्यांकडून केला जातो. त्यात मे महिन्यात हे वीटभट्टी उत्पादक आपल्या वीटभट्ट्या पेटवत असतात. दरम्यान, अवकाळी पावसाने सलग तीन-चार दिवस जोरदार हजेरी लावल्याने वीटभट्टी उत्पादकांचे मोठे नुकसान झाले आहे.

दरम्यान, या व्यवसायासाठी कर्नाटक राज्यातून विटा थापणारे कामगार मजूर आणले जातात, तर काही मजूर हे



तालुक्यातील आदिवासी वाड्यांमधील असतात. साधारण एप्रिल आणि मे महिन्यात सर्व वीटभट्ट्यांची उभारणी करून मजूर आपल्या घरी गावी परतत असतात. मात्र, यावर्षी त्या मजुरांचे आणि वीटभट्टी उत्पादक यांचे मोठे नुकसान अवकाळी पावसाने केले आहे. कर्जत वीटभट्टी उत्पादक संघटना यांच्याकडून वीटभट्टी

### व्यावसायिक हतबल

उत्पादकांच्या समस्यांवर चर्चा केली जाते आणि त्यात सर्वात कठीण प्रश्न हा महसूल विभागाची रॉयल्टी भरावी लागते आणि त्यावरून महसूल विभागाला चांगला कर मिळतो. पावसामुळे विटांची पुन्हा माती तयार झाल्याने त्या मजुरांच्या मेहनतीचे पैसे वाया गेले आहेत. तालुक्यातील वीटभट्टी संघटना यांच्याकडून महसूल विभागाला रॉयल्टी भरली जात असल्याने शासनाने आम्हलादेखील नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी केली आहे. वीटभट्टी उत्पादक यांच्याकडून तहसीलदारांना निवेदन देण्यात येणार असून, वीटभट्टी उत्पादकांना भरपाई मिळणार का, असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे.

## शिवाजी शिंदे यांचे निधन

**खांब** : रोहा तालुक्यातील मुठवली खु. गावचे रहिवासी शिवाजी नारायण शिंदे यांचे मंगळवार, दि.१४ मे रोजी अल्पशा आजाराने मुंबई येथील रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. ते सुमारे ६० वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, चार मुलगी, जावई, नातवंडे, मोठे भाऊ, पुतणे, मेहुणे असा मोठा परिवार आहे. त्यांचे दशक्रियाविधी गुरूवार २३ मे रोजी तर अंतिम धार्मिकविधी शुक्रवार, दि.२४ मे रोजी मुठवली येथील राहत्या निवासस्थानी होणार आहेत.



# चौलनाका येथील रस्त्याची दुरवस्था

। रेवदंडा । वार्ताहर ।

अलिबाग तालुक्यातील चौल नाक्यावर रस्त्याच्या दुरवस्थेने नित्याची वाहतूक कोंडी निर्माण होत असल्याचे चित्र दिसते.

चौलनाक्याला तीन रस्ते एकत्रित येत असल्याने तसेच मुरूड तालुक्यातील वाढते पर्यटन यामुळे वाहतुकीचा ताण दिवसेंदिवस वाढीस जात आहे. गेल्या काही दिवसात अलिबाग ते मुरूड या मुख्य रस्त्याचे नूतनीकरण, डांबरीकरणाचे काम करण्यात आले आहे. या कामात चौल नाक्यावरील रस्त्याचे नूतनीकरण व दुरूस्ती करण्यात आलेली नाही. चौलनाक्यावरील रस्तावर या अगोदर पेव्हर ब्लॉक बसविण्यात आले असून, अनेक ठिकाणी ते उखडले आहेत. त्यामुळे रस्ता खडबडीत झाला आहे. तेथून लहान-मोठी वाहने

### वाहतूक कोंडीचा प्रश्नही नित्याचाच



जा-ये करताना खूपच त्रासदायक ठरत आहे. वाहतुकीस सुयोग्य रस्ता न मिळाल्याने वाहतुक संथ गतीने सुरू असते. परिणामी, या रस्त्याला नित्याने वाहतूक कोंडी निर्माण झालेली दिसते.

सार्वजनिक बांधकाम खात्याने चौल नाक्यावरील रस्ताची दुरुस्ती का केली नाही, असा प्रश्न स्थानिक नागरिकांसह वाहनचालकांमधून उपस्थित केला जात आहे. लवकरच पावसाळा सुरू होत असल्याने या चौल नाक्यावरील रस्ता दुरूस्ती व नूतनीकरणाचे काम संबंधितांनी त्वरित करावे, अशी मागणी प्रवासीवर्ग व वाहतूकदार करत आहेत.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. १९ मे ते २५ मे २०२४

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

## परदेशागमनाची संधी मिळेल

**मेष** : राशीधारकांना आपले ग्रहमान पाहता या कालावधीत तुम्ही स्वत:बरोबरही वेळ घालवला पाहिजे, कारण यामुळे तुम्हाला आंतरिक मजबुती मिळेल आणि तुमची इच्छाशक्ती वाढेल. परदेशात जाण्याची इच्छा असणाऱ्यांना या सप्ताहात काही चांगली बातमी मिळू शकेल आणि पूर्वी केलेल्या मेहनत आणि परिश्रमांचे निकाल आता सहज मिळू शकतात. काही लोकांना वडिलोपार्जित मालमत्ता मिळण्याचीही शक्यता आहे. आपल्या पालकांच्या आरोग्याची काळजी घ्या, सप्ताहाचा मधला कालावधी व्यापारीवर्गासाठी चांगले राहील. परदेशी सहलदेखील होऊ शकतात. जे लोक नोकरी करीत आहेत, त्यांची अचानक बदली होण्याची शक्यता आहे, ज्यामुळे ते थोडे विचलित होऊ शकतात. आपण कोणत्याही तीर्थयात्रसाठीदेखील जाऊ शकता, तसा योग आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या काही समस्या कमी होतील. **महिलांना** : दुसऱ्यांवर अवलंबून न राहता आपल्या आत्मविश्वासाने स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. डोक्यातला राग दाबून ठेवू नका, रक्तदाबाची काळजी घ्या. **शुभदिनांक** : २०,२१

## नवीन कामांना मुहूर्त मिळेल

**वृषभ** : राशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान पाहता काही अपूर्ण कामे पूर्ण झाल्यामुळे आराम मिळेल आणि काही नवीन कामेही सुरू करता येतील. तुम्ही बऱ्याच काळापासून असलेल्या संकटातून मुक्त व्हाल आणि एक नवा अध्यायाचा श्री गणेश कराल. या कालावधीत या राशीच्या जातकांना दु:खापासून आराम मिळेल आणि जीवनाच्या चक्रात आनंदाची प्राप्ती होईल. चालू कालावधी आपल्याला अनेक प्रकारच्या यात्रांमध्ये व्यस्त ठेवेल; परंतु ही यात्रा शुभ आणि कल्याणकारक असेल ही आनंदाची बाब आहे. आपण आपल्या कुटुंबातील सदस्यांसह आकर्षक आणि सुंदर पर्यटन स्थळावर प्रवास कराल. आपण जीवनाच्या नवीन टर्निंग पॉइंटमध्ये प्रवेश कराल जिथे आपणास पाहिजे तसे करण्यास भरपूर स्वातंत्र्य मिळेल. आपण आपल्या ऊर्जेसह आपल्या कामात यश मिळवाल. **महिलांना**- आप्तेष्टांच्या संपर्कात राहता येईल व त्यांची ख्याली-खुशाली घेता येईल. आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका. सार्वजनिक ठिकाणी आपले मतप्रदर्शन करण्याचे टाळावे. पर्स फुगलेली राहील, खर्चासाठी रक्कम येईल. **शुभ दिनांक** : २२, २३.

## आठवडा अनुकूल राहील

**मिथुन** : राशीसाठी आपले ग्रहमान पाहता या कालावधीत बरेच रोमांचक अनुभव घ्यायला मिळतील आणि काहीतरी नवीन शिकण्यासही मिळतील. या सप्ताहात आपण बऱ्याच ठिकाणी सहली होतील. पण त्यामुळे आपल्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. म्हणून संपूर्ण नियोजनासह सहलीला जा. विशेषतः ही वेळ असेल जेव्हा आपण वाहन काळजीपूर्वक चालवावे आणि आपल्या खण्यापिण्यावर विशेष लक्ष द्यावे, त्याव्यतिरिक्त आपल्याला दुसऱ्याच्या भांडणात जाणे टाळावे लागेल आणि मांस, मद्यपान आणि धूम्रपान करण्यासारख्या व्यसनांपासून दूर राहावे लागेल. तरीही हा कालावधी आपल्यासाठी खूप चांगला आणि महत्त्वाचा दिसत आहे. काहीतरी नवीन शिकण्यासाठी आपल्याला काही नवीन आव्हानांना सामोरे जावे लागेल. बऱ्याच प्रकरणांमध्ये आपल्याला बऱ्यापैकी मोकळेपणाने आणि नवीन गोष्टी शिकण्यात रस वाटेल. **महिलांना**- आपल्या आवडीच्या गोष्टी करण्यात आनंद घेता येईल. दूरच्या आप्तेष्टांशी वार्तालाप होण्याची शक्यता आहे. माहेरची मंडळी आल्याने आपल्या आनंदाला पारावार नसेल. **शुभ दिनांक**-२४,२५.

## भावंडांची मदत होईल

**कर्क** : राशीधारकास या सप्ताहात आपण आपल्यासाठी हे दिवस संभाव्यतेचे आहेत आणि आपल्या स्वतःस प्रत्येक कठीण उद्दिष्ट साध्य करण्याची क्षमता निर्माण होणार आहे. आपल्या भावंडांशी चांगला संबंध ठेवा आणि वादविवाद होऊ देऊ नका. लक्षात ठेवा आपण फक्त भावंडांच्या मदतीने पुढे जाऊ शकाल. आपणास अशा मित्रांचे सहकार्य देखील मिळेल जे आपल्याला सकारात्मक विचारसरणीसह पुढे जाण्यास प्रोत्साहित करतील. दुसऱ्यांवर अवलंबून न राहता स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न करा. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करावा, वादाचे प्रसंग टाळावेत. आपली आई मामा कडील माणसे घरी येतील त्यांची ऊठबस करावी लागेल, महिलांना- वैवाहिक जोडीदाराशी जुळवून घ्या. आपल्या ध्येयासाठी प्रयत्नशील राहा.. नको त्या जबाबदाऱ्या स्वीकारू नका **महिलांना**- प्रकृतीस्वास्थ्य जपा. विरोधकांच्या कारवायांवर नजर ठेवा. आपल्या घरात एखादी किमती वस्तूची खरेदी होणार आहे. मोठ्या व्यक्तिनचे रागाचे बोलणे मनावर घेऊ नका. आपल्या रागावर नियंत्रण ठेवून शांतता बाळगल्यास आपण सर्व बाबतीत अग्रेसर राहू शकाल. **शुभ दिनांक** - २०,२३

## वरिष्ठ कामाची प्रशंसा करतील

**सिंह** : राशीसाठी या सप्ताहात आपल्या कामाची प्रशंसा केली जाईल. या कालावधीत आपण खूप आशावादी असाल आणि स्वत:च्या विश्वासामुळे पुढे जाण्यासाठी आपल्याला अनेकांकडून प्रोत्साहित केले जाईल, परंतु त्यामध्ये कोणतेही काम करण्यापूर्वी आपण पुरेशी तयारी करणे आवश्यक आहे हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. या सप्ताहात आपल्याला मुख्यतः आपल्या आरोग्यावर लक्ष केंद्रित करावे लागेल कारण कदाचित ही तुमची कमकुवत बाजू असेल. अचानक बदलणारे वातावरण आपल्या आरोग्यावर परिणाम करू शकते. नियमित आणि चांगल्या दिनचर्या पाळा आणि निरोगी राहा. परंतु आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की अत्यधिक आवेगाने कार्य केल्याने आपल्या सभोवतालच्या लोकांवर परिणाम होईल, म्हणून संयमाने काम करा. आपल्याला बरेच कठीण कार्ये पूर्ण करावे लागतील ज्यामुळे आयुष्यात पुढे जाण्यासाठी मार्गदर्शन आणि प्रेरणा मिळेल. **महिलांना**- ह्या दिवसांत आरोग्यास विशेष काही त्रास होण्याची शक्यता नसली तरी पहिल्या दोन दिवसात पोटात जळजळ, पायांच्या स्नायूंचे दुखणे होण्याची शक्यता आहे. **शुभदिनांक**-१९,२२

## कलागुणांना वाव मिळेल

**कन्या** : राशीसाठी या सप्ताहात शनी राशीच्या या कालावधीत परदेशी सहलींचे योग बनले आहेत, म्हणून जर तुम्ही आताच या दिशेने प्रयत्न करीत असाल, तर या वेळेचा पुरेपूर फायदा घेण्यास तयार व्हा. जर आपण लहान व्यावसायिक असाल, तरी आपल्याला या कालावधीत बदलीचे योग आहेत, आपण आपल्या घरापासून दूर काम करत असल्यास यावर्षी आपण आपल्या घराजवळ येऊ शकता. जर आपला एखादा व्यवसाय असेल, तर आपल्याला त्यासंदर्भात बराच प्रवास करावा लागेल जेणेकरून आपला व्यवसाय संबंध दृढ होईल. आपण कोणत्याही सर्जनशील कामात व्यस्त असल्यास हा सप्ताह भरभराटीचा जाऊ शकतो. या कालावधीत आपल्याला काही किरकोळ त्रास आणि अडचणींना सामोरे जावे लागेल आणि काही कठीण आव्हानांवर मात करावी लागणार आहे. आपण खूप उत्साहित व्हाल आणि आपल्या ऊर्जेच्या मदतीने प्रत्येक आव्हानाचा सामना कराल आणि त्यास यश मिळवाल. सुरवातीला संसर्गजन्य आजारापासून तब्येत सांभाळा. महिलांना घरबसल्या हा काळ उत्तम असून, त्यांच्या कलागुणांना वाव मिळेल. **शुभदिनांक**- २०,२४

## आपला नावलौकिक वाढेल

**तुळ** : राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता व्यवसायामध्ये आपण नावलौकिक मिळवू शकता. चालू कालावधी आपल्यासाठी एक मैलाचा दगड ठरू शकेल. कारण आपण आपल्या क्षेत्रात चांगले यशस्वी होण्याची अपेक्षा करू शकता. म्हणून प्रत्येक संधीचे भांडवल करण्यास सज्ज व्हा आणि उच्च यश मिळवा. म्हणून नोकरी मिळवण्यासाठी जर आपण या दिशेने प्रयत्न करीत असाल, तर आपले प्रयत्न थोडेसे वाढवा आणि देवाच्या कृपेने आणि आशीर्वादाने आपण या कालावधीत एक चांगली नोकरी मिळेल, सोबत जीवनसाथी मिळवू शकाल. या राशीच्या लोकांच्या व्यवसाय भागीदारीमध्ये ग्रहांच्या प्रभावाचा बराच फायदा होईल. आपली आर्थिक गुंतवणूक करताना तुम्ही बरेच गृहपाठ केले पाहिजे, तरच तुम्ही त्या कामात यशस्वी व्हाल. **महिलांना**- घरातील अनावश्यक खर्चाला आळा घाला, त्यामुळे मनावर ताण येणार नाही. आपण बोलण्यावर नियंत्रण ठेवून कृतीवर भर दिल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. नोकरदारांना दिलासा मिळेल. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल. **शुभ दिनांक**- २१,२३

## इच्छपूर्तीमुळे मनोबल उंचावेल

**वृश्चिक** : राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपल्याला काही नवीन संधी मिळतील आणि त्या संधीमुळे आपल्याकडे संपूर्ण ऊर्जा आणि तग धरण्याची क्षमतादेखील वाढलेली असेल. आपण आपला हात ज्या कार्यात ठेवाल, त्यात आपल्याला यश मिळेल आणि आपले सर्व उद्योग सुरळीत चालू होतील. या कालावधीत सुरुवातीस आपण कमी अंतराच्या ट्रीप जास्त कराल आणि आपल्याला यामुळे फायदाही होईल. सप्ताहाच्या सुरुवातीस आपण यात्रेवरदेखील जाऊ शकता. याव्यतिरिक्त, सामाजिक कार्याशी संबंधित कामकाजामुळे आपण काही सहलीदेखील करू शकता. आपले परदेशी जाण्याची चांगली शक्यता आहे. यावेळी आपल्या बऱ्याच दिवसांपासून प्रलंबित असलेल्या इच्छा पूर्ण होतील, ज्यामुळे तुमचे मनोबलदेखील वाढेल. या दरम्यान आपण आपले घर तयार करण्यासाठी किंवा मालमत्ता खरेदीसाठी कर्ज घेऊ शकता. **महिलांना**- नको त्या विचारात अडकू नका. तब्येत ठीक वाटत नसेल तर प्रवास टाळा. मित्र, मैत्रिणी खुशखबर देतील. सप्ताहाच्या मध्यावर धनलाभ संभवतो. **शुभदिनांक**- २०,२५.

## जोडीदाराशी प्रेमाने वागा

**धनु** : राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण या राशीचे लोक प्रेमाच्या बाबतीत खूप रोमँटिक असतात आणि एखाद्यावर मनापासून प्रेम करतात. या व्यक्तींना आपल्या अहम आणि आवेगावर नियंत्रण ठेवणे गरजेचे असेल, कारण हेच सर्व पुढे तुमच्या लव्ह लाईफमध्ये अडचणी आणू शकतात. आपण त्यावर नियंत्रण ठेवण्यास सक्षम असावे म्हणून या सप्ताहात आपला अहंकार बाजूला ठेवा आणि आपल्या जोडीदारावर प्रेम करा. नको त्या विचारात अडकू नका. तब्येत ठीक वाटत नसेल तर प्रवास टाळा, मित्र, मैत्रिणी खुशखबर देतील. सप्ताहाच्या मध्यावर धनलाभ संभवतो. ह्या सप्ताहात आरोग्यास विशेष काही त्रास होण्याची शक्यता नसली तरी पहिल्या दोन दिवसांत पित्त प्रकोप, पोटात जळजळ, पायांच्या स्नायूंचे दुखणे होण्याची शक्यता आहे. **महिलांना**- कामात असताना तब्येतीकडे दुर्लक्ष करू नका, झोप व खाणे वेळेवर करा, आपण आपली अस्मिता क्षुल्लक कारणाने दुखावली जाणार नाही याची दक्षता घेतल्यास आपल्या मनाप्रमाणे पुष्कळशा गोष्टी साध्य होणे शक्य आहे. **शुभदिनांक**- १९,२३.

## आनंददायक घटना घडतील

**मकर** : राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता या राशीच्या जातकांना मिश्रित निकाल मिळेल. या कालावधीत आपले समंजसपणाचे कौशल्य वाढेल, त्यामुळे नातेसंबंध वाढतील आणि आपण निसर्ग आणि आयुष्यातून बरेच काही शिकू शकाल. काही नवीन मित्रही बनतील. सुरुवातीला या काळात आपण भविष्यासाठी बऱ्याच योजना तयार कराल, ज्यामध्ये आपणास यश मिळेल आणि आपल्या बऱ्यापैकी प्रलंबित इच्छा पूर्ण होतील. आपण या कालावधीत आपल्या जीवनात प्रेमाचे आणि प्रणयरम्यतेचे स्वागत करण्यास तयार असावे. जर आपण आधीपासूनच घरगुती नात्यात असाल किंवा एखाद्या माहितीचा शोध घेत असाल, तर या प्रकरणात आपल्याला आनंद देण्यासाठी आपले ग्रह कार्य करतील. या कालावधीत आपले विवाहदेखील होण्याची शक्यता आहे.

**महिलांना**- तरीही ग्रहमान पाहता आपण प्रत्येक कार्यात शांतता बाळगून, विचारपूर्वक वागून निर्णय घेतल्यास हा सप्ताह तुमच्या दृष्टीने चांगला जाईल. महिलावर्गाला सासूरवाडीकडून काही शुभसंकेत मिळतील. **शुभ दिनांक**- २३,२४

## वरिष्ठांच्या सल्ल्याने निर्णय घ्या

**कुंभ** : राशी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपले बऱ्याच महत्त्वपूर्ण पदांवर बसलेल्या लोकांशी संबंध स्थापित केले जातील, जे भविष्यात आपल्यासाठी उपयुक्त ठरतील. या कालावधीत आपण खूपच स्वातंत्र्य अनुभवाल आणि अनेक निर्णय घ्याल, पण आपणास हे लक्षात ठेवले पाहिजे की, कधीकधी आपले निर्णय चुकीचे असू शकतात. म्हणूनच काही ज्येष्ठ आणि अनुभवी व्यक्तीच्या सल्ल्यानेच कार्य करा अन्यथा नफ्याच्या ठिकाणी तोटा होण्याची शक्यता आहे. जर आपण चांगले व्यवस्थापन केले, तर हा कालावधी आपल्या आयुष्यातील सर्वोत्तम कालावधीपैकी एक असेल. म्हणून या दिवसांमध्ये आपण वाहन विकत घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे जेणेकरून आपण एका चांगल्या वाहनाचे मालक होऊ शकता. या दिवसांत आपण उच्चस्तरावर आनंदाचा आनंद घ्याल आणि आपल्या सुविधांवरही चांगला खर्च कराल. मुलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा. **महिलांना**- हा कालावधी आपल्यासाठी पायघड्या घालून ठेवल्या असतील. जे कराल त्यात यश मिळू शकते. पैसा जपून ठेवण्यास शिका. **शुभ दिनांक**- २१,२५.

## नशिबाची साथ मिळेल

**मीन** : राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण आपल्या वडिलांशी संबंध सुधारण्याचा प्रयत्न करा, यामुळे फक्त तुम्हाला नशिबाची साथच मिळणार नाही तर तुमची प्रगतीदेखील होईल भरपूर होईल. या सप्ताहात तुम्हाला काही कठीण निर्णय घ्यावे लागतील कदाचित यामुळे तुम्ही दुखावले जाऊ शकता. तुमच्याकडे प्रत्येक कठीण काळात आणि आपल्या मनोबलातून बाहेर पडण्याची क्षमता तुम्हाला सक्षम बनवू शकते. जरी आपल्याला असे निर्णय घ्यावे लागले, तरीही घाबरू नका. कारण, हे आपल्या भविष्यासाठी खूप चांगले आहे. एकंदरीत, हा कालावधी या राशीच्या लोकांना मिश्रित परिणाम देईल आणि आपण आपल्या मनोबल आणि परिश्रमांच्या बळावर बरेच लक्ष्य साध्य करू शकता. आपण आपल्यातील काही कमतरता दूर करून यशस्वी व्यक्ती म्हणून उदयास व्हाल. **महिलांना**- हा असा एक सप्ताह असेल ज्यात आपल्यास साहस असेल प्रेम असेल आणि आपल्या प्रियजनांचा साथ ही असेल. आपल्याला आपली क्षमता त्याच्या पूर्ण संभाव्यतेसाठी आणि या कालावधीसाठी वापरावी लागणार आहे. वैवाहिक जोडीदाराशी जुळवून घ्या. आपल्या ध्येयासाठी प्रयत्नशील राहा. **शुभ दिनांक**-२३,२४

मोहोर

# होर्डिंग काळ बनून येते तेव्हा...

**प्रसिद्धीचे एक माध्यम म्हणून अवाढव्य होर्डिंग उभे करण्याचा पायंडा पडला आणि कालौघात तो अस्ताव्यस्त पसरला. मात्र, आधी पुणे आणि त्यानंतर घाटकोपरमधील घटनेने अनधिकृत आणि अजस्त्र होर्डिंगचा धोका किती मोठा आहे, हे दाखवून दिले. त्यापासून धडा घेत भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी आता तरी यासंबंधीची निश्चित नियमावली आणणे आवश्यक आहे. त्यासाठी यंत्रणा कार्यरत असायला हवी.**

विवेक वेलणकर

घाटकोपर येथील होर्डिंग कोसळण्याची घटना आपल्या सुरक्षेचे संकट किती गंभीर आहे, हे दाखवून गेली. अवकाळी पावसाने मुंबईतील छेडानगरच्या पेट्रोल पंपाजवळील हे महाकाय अनधिकृत होर्डिंग कोसळले आणि त्याखाली माणसांबरोबरच बरीच वाहने दबली जाऊन काहींनी जीव गमावला तर बरेचजण खाली अडकून पडले. मुख्य म्हणजे लोहमार्ग पोलिस कर्मचारी वसाहतीच्या जागेवरील हे अनधिकृत होर्डिंग हटवण्यासाठी मुंबई महापालिकेने अलिकडेच जाहिरादारांना नोटीस बजावली होती. त्यामुळेच याची दखल घेऊन वेळीच योग्य कारवाई झाली असती तर मोठी जीवितहानी टळली असती. मात्र, आपल्याकडील ढिसाळ यंत्रणेकडून ही अपेक्षा ठेवणे अयोग्य आहे. काही वर्षांपूर्वी पुण्यातही अशाच पद्धतीने एक होर्डिंग कोसळून त्याखाली दबल्यामुळे पाच जणांचा मृत्यू झाला होता. त्याखाली अडकल्यामुळे काही वाहनांचेही मोठे नुकसान झाले होते. या अपघाताचे व्हिडिओ आजही अनेकांना आठवत असतील. घाटकोपरमध्ये वादळी वाऱ्यामुळे तशाच घटनेची पुनरावृत्ती घडली. अशा या घातक पध्दतीने होर्डिंग उभारणाऱ्यांवर आता तरी कारवाई होणार का, हा प्रश्न पडतो.

यानिमित्ताने मांडावासा वाटणारा पहिला मुद्दा म्हणजे होर्डिंगसाठी एक वेगळे धोरण असणे गरजेचे आहे. मुख्य म्हणजे, त्यात घालून दिलेल्या नियमांचे काळजीपूर्वक आणि आग्रहाने पालन झाले पाहिजे. मग ते होर्डिंग महापालिकेच्या जागेत असो, रेल्वेच्या जागेत असो वा अन्य कोणाचे असो; अशा प्रत्येक होर्डिंगसाठी हे नियम आवश्यक आहेत. पुण्यातील होर्डिंग दुर्घटनेबाबत बोलायचे तर ते रेल्वेच्या जागेत होते. त्यामुळे महानगरपालिकेने याचा आमच्याशी काही संबंध नाही, असे म्हणत हात झटकले. मात्र, हे काही या समस्येवरचे उत्तर असू शकत नाही. जबाबदारी कोणी ना कोणी स्वीकारायलाच हवी. म्हणून सर्वंकष धोरणांचा अवलंब होणे गरजेचे

असून त्यात सर्वाधिक महत्त्वाचा मुद्दा संरक्षणाचा असायला हवा. सुरक्षा आणि संरक्षणासंबंधीचे हे निकष त्या त्या संबंधित यंत्रणेने घालून दिले पाहिजेत आणि त्याच्या अंमलबजावणीकडेही लक्ष ठेवले पाहिजे. म्हणजेच एखाद्या कॉंट्रॅक्टरने सुरक्षा आणि संरक्षणाचे निकष वा नियम ठरवून चालणार नाही. कारण ते नेहमीच आपल्या सोयीचे नियम ठरवणार. म्हणूनच हे नियम ठरवणारी यंत्रणा देशपातळीवर कार्यरत असणे ही काळाची गरज आहे, असे म्हणावे लागेल. अशी एखादी यंत्रणा असेल तर तिचे निगुतीने पालन झाले पाहिजे. तरच यापुढे अशा दुर्घटना घडण्याची शक्यता कमी होईल. अशा दुर्घटना घडल्यानंतर दर वेळी तात्पुरती कारवाई केली जाते. मात्र काही काळातच तो विषय मागे पडतो. नुकसानभरपाई द्या आणि विषय संपवा, असाच यामागचा एकूण विचार असतो. असे असेल तर अशा प्रकारच्या घटना सातत्याने घडणे ही अत्यंत स्वाभाविक बाब आहे. त्यामुळेच आता अशा चुका सुधारण्याखेरीज पर्याय नाही.

केवळ परवानगी दिली आणि सुरक्षेच्या सर्व नियमांचे पालन केल्याची खात्री केली म्हणजे सगळे प्रश्न सुटले असेही समजण्याचे कारण नाही. होर्डिंग उभे राहिल्यानंतर वेळोवेळी त्याची तपासणी होणेदेखील अत्यंत गरजेचे आहे. कदाचित पहिल्यांदा सगळ्या नियमांचे पालन केले जाईलही, मात्र नंतरच्या काळातही त्यांचे पालन केले जाते की नाही, हे पाहणे गरजेचे आहे. त्यासाठी तपासणीचे महत्त्व जाणून घ्यायला हवे. दर तीन महिने, सहा महिने, एक वर्ष अशा ठराविक कालावधीनंतर प्रत्येक होर्डिंगची तपासणी केली गेली तर काळानुरुप उद्भवणाऱ्या त्रुटी समोर



येतील. साहजिकच त्या दूर करण्यासाठी योग्य ती पावले उचलणे शक्य होईल. म्हणूनच तपासणीचा नियमही पाळणे गरजेचे आहे.

अशा होर्डिंगचा आकार किती असावा,



ते बनवण्यासाठी कोणत्या साहित्याचा वापर करावा यासंबंधीही ठोस नियम असायला हवे. सध्या यासंबंधीची कोणतीही नियमावली नसल्यामुळे दुर्घटनांचा धोका वाढता आहे. अनेकदा होर्डिंगचा समतोल ढासळतो आणि ते कोसळते. वादळासारख्या नैसर्गिक दुर्घटनांमध्ये अशा घटनांची शक्यता अनेक पटींनी वाढते. नेमका पाऊस, अवकाळी, वादळ वा तीव्र वारे असताना लोक झाडे वा मोठ्या होर्डिंगच्या आडोशाला उभे राहतात आणि अशा दुर्घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात जीवितहानी होते. ही समस्या वा वास्तव लक्षात घेऊन यापुढे तरी होर्डिंग उभारताना त्याची मापे काय असावीत, त्याला आधार देणाऱ्या घटकांचे वा साहित्याचे मोजमाप आणि प्रकार कोणता असावा, त्यांचा दर्जा कसा असावा, इथपर्यंतच्या सगळ्या गोष्टींचा विचार करण्याची वेळ आता आली आहे. तरच अशा घटनांची पुनरावृत्ती टळू शकेल. अन्यथा, वारंवार अशा घटना पहायला मिळतील, यात शंका नाही.

होर्डिंग पॉलिसी ठरवताना ती कुठे असावी, दोन होर्डिंगमध्ये नेमके किती अंतर असावे याचादेखील विचार व्हायला हवा. या दृष्टीने अन्य देशांमधील स्थिती पाहिली तर मुळात तिथे इतक्या मोठ्या संख्येने आणि जागोजागी होर्डिंग नसतात. असतात ती साधारणतः हमरस्त्याच्या कडेला असतात. म्हणजेच हा भाग थेट रहदारीच्या, वर्दळीच्या जागेपासून पुरेशा सुरक्षित अंतरावर असतो. त्यामुळेच चुकून एखादे होर्डिंग पडले तरी ते रस्त्यावर येत नाही. बाजूच्या मोकळ्या जागेत पडू शकते. स्वाभाविकच परदेशामध्ये अशा दुर्घटना घडल्या तरी जीवितहानी होण्याची शक्यता नगण्य वा बरीच कमी असते. तिथे माणसाच्या जिवाला मोठी किंमत असते. उलटपक्षी, आपल्याकडे हा विचारही केला जात नाही. आपल्याकडे माणसाचे आयुष्य हीच एक सर्वात स्वस्त बाब झाली आहे. म्हणूनच आपण या बाबतीत अजून कित्येक योजने मागे आहोत, हे समजून घ्यायला हवे. आपल्याकडेही हायवेवर अनेक होर्डिंग बघायला मिळतात. पण ती रस्त्यावर नसतात. बाजूला असतात. त्यामुळेच त्यातील एखादे पडले तरी रस्त्यावर येणार नाही, हे पाहिले जाते. मात्र शहरात हा नियम पाळला जात नाही, कारण गर्दीच्या भागात त्यासाठी पर्याप्त जागाच उपलब्ध नाही. खेरीज होर्डिंग लावण्यामागील मुख्य उद्देश तो लोकांच्या सहज नजरेस पडावा असा असतो. त्यामुळे शहरी भागांमध्ये तो आडबाजूला वा रस्त्यापासून बऱ्याच दूरवर लावूनही परिणाम साधणार नाही. म्हणूनच मग लोकांना कुठूनही सहज दिसतील आणि त्यांचे लक्ष वेधून घेतील अशी जागा हेरुन ही महाकाय होर्डींग्ज उभारली जातात. मात्र योग्य जागेअभावी अशी अजस्त्र होर्डिंग नेहमीच संभाव्य दुर्घटनेची आशंका जागी ठेवतात. हे टाळण्यासाठी आधी रहिवासी वा गर्दीच्या भागातील होर्डिंगचा आकार किती असावा, हे सुनिश्चित असणे आवश्यक आहे. ताजी घटना होर्डिंगचे वाढलेले प्रचंड प्रमाण दर्शवणारी आहे. पुण्यातील दुर्घटनेवेळी देखील हाच मुद्दा समोर आला होता. म्हणूनच यापुढे होर्डिंगचा आकार किती असावा याबाबतच्या नियमांमध्ये अधिक स्पष्टता यायला हवी. खेरीज ते उभे केले जाणार असणाऱ्या भागातील वातावरण, तेथील समस्या या सगळ्यांची माहिती घेऊन नियम ठरवायला हवे. खेरीज आधी उल्लेख केल्याप्रमाणे दर काही कालावधीनंतर त्याची तपासणी होणेही गरजेचे आहे. अशा तपासणीमध्ये स्क्रू ढिले झाले आहेत का, मजबुती देण्यासाठी वापरण्यात आलेले साहित्य मूळ जागेपासून हलले आहे का, या साहित्याला गंज वा यासारखा अन्य धोका निर्माण झाला आहे का, अशा अनेक गोष्टींची माहिती मिळू शकते. हे सगळे नीट असल्याचे बघण्याची जबाबदारी केवळ त्या ठेकेदाराची नाही तर या सगळ्याचे नियमन करणाऱ्या यंत्रणेवरही असली पाहिजे. हवे तर यासाठी काही शुल्क आकारण्यासही हरकत नाही. मात्र या यंत्रणेतल्या लोकांनी तपासणी करणे अत्यंत आवश्यक आहे. शेवटी ठेकेदार वा होर्डिंग उभारणारे कधीच आपल्या चुका मान्य करणार नाहीत वा पुरेशा काळजीपूर्वक तपासणीही करणार नाहीत, हे सूर्यप्रकाशाइतके सत्य आहे. मात्र एखाद्या जबाबदार यंत्रणेकडून तपासणी झाली तर कच्चा दुवा शोधणे शक्य होईल.

आत्तासारखीच पुण्यातील होर्डिंग दुर्घटनेनंतर बरीच चर्चा झाली होती. मात्र त्यानंतर आजपावेतो अशा घटना रोखण्यासाठी एकही पाऊल उचलले गेलेले नाही. खरे तर त्या घटनेनंतर सविस्तर विश्लेषण होऊन दोषींना शिक्षा होण्यापर्यंतची पावले उचलली जाणे अपेक्षित होते. मात्र तसे काही घडल्याचे ऐकिवात नाही. सहाजिकच काही दिवसांनी लोक अशा घटना विसरुन जातात. पुढच्या वेळी तशीच घटना घडते, तेव्हाच त्याचे स्मरण होते. म्हणूनच आताच्या ताज्या घटनेची तरी संपूर्ण आणि सखोल चौकशी व्हायला हवी आणि दोषींना कठोर शिक्षाही व्हायला हवी. हे प्रकरण शेवटपर्यंत व्यवस्थित हाताळले गेले तरच भविष्यात काही सुधारणा दिसून येईल. अन्यथा परिस्थिती बदलणार नाही. **

# ‘हरीच्या घरी’ श्लोक आणि मालवणी माणूस

कोकणस्पंदन

धनंजय शेट्ये



मालवणी मुलखात लग्नसमारंभात एक आत्मीयतेची वेगळीच सामाजिक बांधिलकी जपली जाते. एकमेकांच्या आर्थिक परिस्थितीचा अंदाज घेऊन सामुदायिक पारंपरिक कौटुंबिक लग्नसोहळ्यात एखाद्याच्या कौटुंबिक आर्थिक परिस्थितीला हातभार लावला जातो. मुळात, गावात होणारी लग्नकार्ये ही घरीच अंगणात खळ्यात पार पडत असतात. अगदी लग्नाच्या आमंत्रणापासून ते लग्नानंतरही पाच पर्तावणापर्यंत सोहळाच असतो. आमंत्रण, मंडप सजावट करण्यासाठी संपूर्ण वाडीतील माणसे आत्मीयतेने, आपुलकीने सामाजिक जबाबदारीने आठवडाभर आधीच कामाला लागतात. लग्नाच्या पंगतीचं संपूर्ण जेवणही गावकरीच एकत्र येऊन विनामोबदला बनवतात. पंगतीला जेवण वाढणं, उष्ट्या पत्रावळी उचलणं, झाडू मारणं ही कामेही आपुलकीने, सामाजिक जबाबदारीने करताना दिसतात. एखाद्या हॉलमध्ये लग्नसोहळा हा काही तासांपुरताच मर्यादित असतो, तर गावाच्या घरच्या अंगणात पार पाडणारे लग्नसोहळे म्हणजे दहा-पंधरा दिवस आधीपासूनच एक जल्लोष असतो. वाडीतील सर्व सदस्य हे आठवडाभर आधीपासून लग्नघरातच वावरत असतात. लग्नाच्या आधी चार दिवसांपासूनच लग्नघरात सहकार्य करणाऱ्या शेजाऱ्यांच्या दररोज जेवणाच्या पंगती उठत असतात. अर्थात, तरी लग्नघरचा खर्च हा हॉलवर लग्नाच्या खर्चाच्या कितीतरी कमी पटीने असतो. अशी घरच्या अंगणात पार पडलेली लग्न सर्वांच्याच आयुष्यभर लक्षात राहतात.

‘‘हरिच्या घरी शेवया तुपपोळया’’

ईनगो परब जोरात बेंबीच्या देठापासून श्लोक म्हणू लागला. लग्नाला गर्दी भरपूर जमली होती. पण, आबल्या व्हाळकाराच्या मुलींचे सुगंधाचे लग्न होते. आबलो व्हाळकार म्हणजे सर्वांसाठी जीव की प्राण! कोणत्याही अडचणीच्या काळात आबल्या मदतीसाठी धावून यायचा. सर्वांशीच चांगला होता. माणुसकी जपणाऱ्या दिलदार, मनमिळाऊ स्वभावामुळे आबल्याने मित्रपरिवार जपला होता.. पण घरची गरिबी होती तरीही तो खर्चासाठी पाठीपुढे बघणारा नव्हता.ओढाताण करुन आपल्या थोरल्या मुलीचे लग्न दणक्यात करायचे ठरवले होते. प्रत्येकाच्या वेळ प्रसंगात मदतीसाठी उभा राहणारा आबलो कोणाला हवा नि कोणाला नको अशी परिस्थिती निर्माण झाली होती. जो तो आबल्यासाठी मदतीला तयार होता. आज सुगंधाच्या लग्नाला पहिल्या पाच पंगती व्यवस्थित जेवल्या होत्या. पण, अलोट गर्दी लोटल्यामुळे जेवण बनविणाऱ्या गावकऱ्यांना जेवणाचा अंदाज बांधता आला नव्हता. जेवनसुद्धा थोडक्याच मर्यादित पदार्थ केलेले होते. उगाच गरीब माणसाच्या अन्नाचा विद्ध्वंस व्हायला नको. पण, ऐनवेळी माणसे जास्त आली होती. आता करणार काय? बरं एवढं परत जेवण एवढ्या लवकर बनवणे म्हणजे जीवाला काळ आल्यासारखे होते. आणि आबल्याच्या शेजाऱ्यानी आधीच ठरवले होते. लग्नात घरच्या लग्नासारख्या काम करायचे. जर जेवण कमी पडले, तर प्रत्येकाने आपापल्या घरी जाऊन जेवायचे. फक्त पाहुण्यांची शोभा करायची.

ईनग्या परबाने जेवणाचा अगदी अंदाज बरोबर घेतला व अगदी बरोबर ‘हरीच्या घरी’ सुरु हे श्लोक सुरू केले. वाडीतल्या जुन्या जाणत्या वयस्कर लोकांनी ईनग्या परबाला तशी सक्त ताकीदच दिली होती. कारण, हरीच्या घरी श्लोक म्हटला की जेवणावरुन आटापतं घेऊन उठायचं. शेवटचा श्लोक म्हणजे ‘हरीच्या घरी’ असा अलिखित सांकेतिक समीकरण असतं.

एखाद्या गरीब घरच्या लग्नकार्यात अचानक जेवण संपले तर ‘हरीच्या घरी’ लवकर श्लोक सुरु झाले काय लग्नघरात आलेल्या पावण्यांनाही समज येते आणि मोठ्या मनाने जेवणाच्या पंगतीतून समाधानाने उठतात. लग्नाचा विधी व्यवस्थित पार पाडत. यासाठी कोकणी माणसाचे मन लागते. कोकणी मालवणी माणूस हा बाहेरून जसा काटेरी फणसासारखा असतो, पण आतून फणसाच्या गऱ्यांसारखा मधाळ असतो. संकटकाळात मदतीला उभा राहिला तर स्वतः काष्टेला धोतर नेसलेलेसुद्धा मदतीसाठी सोडून द्यायला मागे-पुढे पाहणार नाही.

मालवणी माणसं प्रत्येक सण अगदी दणक्यात साजरा करतील. गरीब असले तरीही आनंदाच्या उधाणाला कधी ओहोटी लागणार नाही. सणासुदीला नैवेद्याला गुळाचा खडा ठेवूनसुद्धा चालीरीतीचे काम करुन घेतील, पण कुणासमोर ‘हाजी नाय हाजी’ करुणार नाहीत. वाडीतील कोणाच्याही घरात लग्न असले तर घरचे कार्य म्हणून वावरतील. एकमेकांच्या संकटात भावबंदकीतली आड्यामेरेवरुन असणारी भांडणे चुलीत फेकून मदतीला उभी राहतील. ही माणुसकी प्रत्येक मालवणी माणसात दिसणारच. **

# महाराष्ट्राचा विकास करणारे राजकारण हवे!



आचार-विचार

डॉ. विलास पवार

लोकशाहीच्या उत्सवामध्ये आता रंगत निर्णायक टप्प्यावर आली आहे. पहिला टप्पा १९ एप्रिल, दुसरा टप्पा २६ एप्रिल, तिसरा टप्पा ७ मे, चौथा टप्पा १३ मे. पाचवा टप्पा २० मे. महाराष्ट्रात पाच टप्प्यात होणाऱ्या लोकसभा निवडणुका पाचव्या अंतिम टप्प्यात पोहचल्या आहेत. या पाचव्या अंतिम टप्प्यात पोहोचताना महाराष्ट्रासाठी राजकीय भाषणबाजी, उणीदुणी काढणारी वक्तव्ये, वादग्रस्त मुद्द्यांची धुळवड राज्यातल्या जनतेला पाहायला, ऐकायला मिळाली आहे. या राजकीय भाषणबाजीने राज्यात असलेल्या समस्या आणि आव्हानांवर प्रकाशझोत अजिबात टाकला नाही. याउलट, प्रगतीचा नारा देणारे, विकास पुरूष समजणाऱ्या सर्व नेतेमंडळींना परस्पर विरोधकांची नाक कापण्यात जास्त स्वारस्य ठेवले आहे. सर्वपक्षीय एका मुद्द्यावर एकमत झाल्यासारखे वागत आहेत. एकमत झालेला मुद्दा आहे तो म्हणजे एकमेकांच्या तोंडाला काळे फासणे, एकमेकांची नाकं कापणे. सर्वपक्षीय राजकारण्यांना राजकीय भाषणबाजी करताना निवडणुकांचा प्रचार करताना राज्याच्या प्रगतीखुणा स्पष्ट करणाऱ्या, विकासकामांची चर्चा करावीशी वाटली नाही. कोणी कोणाच्या पाठीत खंजीर खुपसला, कोण दगाबाज, कोण गद्दार, कोणी घरात बसून राज्यकारभार केला अशा पद्धतीच्या भाषणांनी मतदारांना काय दिले हाच प्रश्न आहे. २०१९ मधील निवडणुकीत ही राजकीय मंडळी काय बोलत होती, कोणासाठी बोलत होती, कोणाच्या विरोधात बोलत होती याचे भान राहिलेले नाही.

आज हयातील राजकीय मंडळी गेल्या निवडणुकीत ज्यांच्या-ज्यांच्या विरोधात आपण बोलत होती. आज त्यांचे समर्थन करतो आहे यांचा विसर सोयीस्करपणे करताना दिसत आहेत. एकतर राजकारणी मंडळी ही खूप हुश्शार समजत आहेत, नाहीतर मतदार जनतेला वेडे-खुळे समजत असावेत. स्वतःची राजकीय भूमिका, वारा वाहतो त्या पद्धतीने बदलताना दिसत असते. आपल्या राज्यात प्रश्न कोणत्या पद्धतीने भेडसावत आहेत. आपल्या राज्यासाठी कृषी उत्पन्नाला कोणती आव्हाने सोसावी लागत आहेत. राज्यातल्या युवा पिढीला विकासकामांमध्ये सहभागी करून घेण्यासाठी काय उपाययोजना आहेत. प्रगतीपथावर असलेला महाराष्ट्र, प्रगतीच्या उच्च पदांवर महाराष्ट्र पोहोचावा यासाठी काय करायला पाहिजे याबाबत कोणीही चर्चा करत नाही. या सर्व गदारोळात महाराष्ट्र आर्थिक स्तरांवर मागे जातो का? याची चिंता कोणीही राजकारणी, कोणताही राजकीय पक्ष करताना दिसत नाही.

महाराष्ट्रातल्या राजकारणांनी संपूर्ण देशात नावलौकिक मिळविला आहे. राज्याचे विद्यमान मुख्यमंत्री पक्षाची तोडफोड करून कसे मुख्यमंत्री झाले, यासाठी त्यांनी किती हाल किती कष्ट भोगले याचा उल्लेख प्रचारसभेत करतात. मुख्यमंत्री झाल्यानंतर महाराष्ट्राच्या प्रगतीचा आलेख किती उंचावला आहे याची खरीखुरी आकडेवारी मात्र जाहीर करताना दिसत नाही. राजकीय पक्ष म्हणून एकत्र संसार केला त्याच सहकाऱ्यांबाबत गरळ ओकण्याचे कार्य करताना जवळपास सर्वच राजकीय पक्ष करताना दिसत आहेत. गुरू-शिष्य, काका-पुतणे, भाऊ-भाऊ, नणंद-जावा, दीर-भावजय, वडिल-मुलगा. ही सर्व नाती आपल्या आयुष्यात महत्त्वाची आहेत. पण, राजकारण्यांना याचासुद्धा विसर पडलेला दिसतो आहे. राजकारण्यांच्या अभिनयकौशल्यतेचा प्रत्यय आता राज्यातल्या जनतेला पाहायला मिळतो आहे. डायलॉग बाजीने घुमवाघुमवी करणारी भाषणे कानांवर पडत आहे. प्रत्येक पक्ष आपणच जनतेचे मसिहा आहोत, अशारितीने वावरताना दिसत आहे. राज्यातल्या जनतेला इतके गहन प्रश्न पडले आहेत की त्याची उत्तरे येणारा काळही त्यांना देणार नाही. त्या प्रश्नांपैकी थोडक्यात चर्चा केली तरी भिरभिरणारे प्रश्न अजून निर्माण होतील. त्याबाबत आपण शिवसेना-भाजप युतीबाबत बोलू. यांनी एकत्र संसार केला. एकत्र विरोधी पक्षाला तोंड दिले. विरोधी पक्षांना उत्तरे देताना युतीचा धर्म जागवला? सत्तेत असणाऱ्या शिवसेनेचा नाणार, वाढवण या प्रकल्पांना विरोध असतानासुद्धा भाजपाने सहन केला. भाजपाने तर विरोधकांच्या विरुद्ध आघाडी उघडली. विरोधकांमध्ये भ्रष्टाचारी निवडले, त्यांना तुरूंगात टाकणारच अशी भीमगर्जना केली आणि अचानक कधीतरी पहाटेच्या शपथविधी उरकून टाकला. प्रयोग अर्धवट यशस्वी झाला. भाजपाच्या जोडीला मग राष्ट्रवादी काँग्रेस मागे राहिली नाही.

शिवसेनेत महत्त्वाकांक्षा उभारीला आली आणि मग मुंबईवरून सुरतवारी झाली, महाराष्ट्राची वैचारिक लुटालूट झाली. त्यापाठोपाठ राष्ट्रवादी काँग्रेसची शकले झाली. कोण खरा, कोण खोटा याचा वाद, कोणता पक्ष कायदेशीर, चिन्ह अधिकृतपणे कोणाचे, याचा वाददेखील झाला. या सर्वांमध्ये महाराष्ट्राची राजकीय प्रणाली, राजकीय सत्वं यांची धुळधाण झाली. कोण कोणत्या पक्षात आहे, कोण कोणते पक्षनेतृत्व पाळतो आहे, याचा पत्ता कोणालाच नाही. आज सकाळी जो पक्ष नेतृत्वाचे गोडवे गात आहे, तो संध्याकाळी कोठे असेल, दुसऱ्या दिवशी सकाळी अन्य कोठे असेल, याचा चक्रावून टाकणारा प्रत्यय राज्यात येतो आहे.

लोकसभा निवडणुका जनतेसाठी आहेत. याचे भान कोणाला आहे असे वाटत नाही. ज्या पक्षाला निवडून द्यायचे आहे, ज्या राजकीय नेत्याला मत द्यायचे आहे, याबाबत महाराष्ट्र जनतेला संशयसुद्धा आहे. आणि संदिग्धता सुद्धा आहे. कोणीही पंतप्रधान झाला काय आणि कोणत्याही पक्षाची सत्ता आली काय, आपल्याला आपले भोग भोगायचे आहेत. या हतबलतेने राज्यातली जनता हवालदिल आहे. साखर उद्योग, कृषी उत्पन्नासाठीचे आयात-निर्यात धोरण, उद्योगधंद्यासाठी आवश्यक धोरण रचना याबाबत महाराष्ट्र कोठे आहे? याची चर्चा व्हायला हवी. आपल्या देशाच्या दक्षिणेकडील राज्ये केंद्राच्या परस्पर विरोधी भूमिका घेऊनसुद्धा प्रगतीची घोडदौड करते आहे. आपल्या राज्याच्या बाजूला गुजरातसारखे राज्य आहे. या राज्यात तर प्रगतीचा महापूर आलेला आहे. त्यांच्या ताटात, वाट्यात, फूलपात्रात सर्व भरभरून पडते आहे. वर मुखवास, बडिशेप त्या अगोदरच गोडधोड सगळे काही ओसंडून वाहते आहे. महाराष्ट्रात मात्र बेदर्दी, दंगलबाजी, करकपट कारस्थानात दंग आहे. त्यात निसर्गसुद्धा अवकाळी, अवेळी पडणारा पाऊस, तर कुठे अवर्षणाचे संकट उधळीत आहे.

लोकशाहीच्या उत्सवात बोटाला काळी शाई लावून सत्ताधीश निवडण्याची यंत्रणा मात्र सर्वसामान्य जनतेला अंधारात घेऊन जात आहे. साधनसूचिता आणि सांस्कृतिक महाराष्ट्राला माथ्याला कोठेतरी काळे फासले जात आहे. यात बदल घडावा, राजकारण्यांचे आचार विचार बदलून महाराष्ट्र विकास साधला जावा, एवढीच आपण अपेक्षा करूया! **

# पैसेवाला का बनायचंय?

निलेश साठे

> पैसा आला तर जगातले सर्व सुख चुटकी सरशी विकत घेता येतात. हवी ती वस्तू हवी तेव्हा मिळते. मनाप्रमाणे आयुष्य जगता येतं. कशाचीही कमतरता भासत नाही. सुख-समृद्धीने भरलेलं आयुष्य असतं. इतरांपेक्षा आपण काहीतरी वेगळं केल्याचा आनंद असतो. बहुतेक समस्यांचे मूळ कारण हे पैशांचा अभाव हेच आहे. मान्य आहे की, पैसा तुम्हाला वरती घेऊन जाता येत नाही; परंतु जोपर्यंत तुम्ही खाली आहात, तोपर्यंत हाच पैसा तुम्हाला खूप वरती घेऊन जाऊ शकतो. आणि आज पैशानेच माणसाची किंमत होते.



काहींना पैसा म्हणजे सर्वस्व आहे. तर काहींना पैशाचं तितकसं महत्त्व नाही. ज्यांना महत्त्व वाटत नाही, त्यांना पैसा मिळवण्याचा मार्ग मिळाला नाही किंवा ते आयुष्याबद्दल फारसे गंभीर नाहीत. कित्येकांना असं वाटत असतं की कमवून कोणासाठी ठेवायचे. एक ना एक दिवस तर आपण मरणार आहे. मग कशाला जीवाचा आटापिटा करून पैसा कमवायचा. आणि शेवटी आपल्याला काय मिळणार आहे. रिकामे हाती आलो, आहे रिकामी हाती परत जाणार. असे म्हणून त्यांनी स्वतः शस्त्र खाली टाकलेले असतात.

मान्य आहे की, पैसा तुम्हाला वरती घेऊन जाता येत नाही; परंतु जोपर्यंत तुम्ही खाली आहात, तोपर्यंत हाच पैसा तुम्हाला खूप वरती घेऊन जाऊ शकतो. आणि आज पैशानेच माणसाची किंमत होते. पैसा असेल तरच विचारतात ना कैसा है. आणि पैसा नसेल तर... कोणीसुद्धा विचारत नाही. ज्याच्याकडे पैसा नाही त्याला कवडीमोल समजतात. आजकालच्या युगात तुम्ही माणूस म्हणून किती चांगला आहात याला कोणी महत्त्व देत नाही; परंतु तुमच्याकडे किती पैसा आहे यावरून तुमची किंमत ठरते. गरीबाच्या घरी एखादा कार्यक्रम असू द्या, बघा फारशी गर्दी होत नाही. पण एखाद्या गर्भश्रीमंताच्या घरी एखादा काही कार्यक्रम असेल तर भल्या मोठ्या रांगा लागतात. श्रीमंतांना पैशाचे मोल कळलेले आहे, त्यामुळे ते पैशाने आणखी पैसा कमवितात. गरिबाला अजून जागृत करावं लागणार आहे.

पेरावं ते उगवतं अशी आपल्याकडे एक म्हण आहे. आपण पैसा पेरला तर पैसा उगवेल. पण पेरण्यासाठीसुद्धा आपल्याकडे पैसा नसेल तर... तर मात्र ही आपली सर्वात मोठी चूक आहे. मेहनत करून काबाडकष्ट करून पहिल्यांदा पैसा कमवावा लागेल. कमावलेला पैसा योग्य ठिकाणी गुंतवणूक करावा लागेल. बचतीचा मार्ग अवलंबवा लागेल. असे म्हणतात की, पैसे कमावणे जेवढे अवघड आहे त्याहीपेक्षा अवघड कमाविलेला पैसा टिकवणे आहे. मग पैशाची गुंतवणूक योग्य आणि खात्रीशीर ठिकाणी करता आली पाहिजे. पैशाने पैसा जोडता आला पाहिजे. तरच श्रीमंतीचा मार्ग खुला होईल.

पैसेवाले का बनायचं, श्रीमंत का व्हायचं? भलेही पैशाने सर्व समस्या सुटत नाहीत; परंतु ९०% समस्या या पैशाने सुटतात. बहुतेक समस्यांचे मूळ कारण हे पैशांचा अभाव हेच आहे. पैसा नसेल तर काय होऊ शकतं याच सर्वात चांगलं उदाहरण म्हणजे एखादा गरीब भिकारी व्यक्ती रस्त्यामध्ये मरून पडलेला दिसला तर त्याच्याकडे कोणाचाही लक्ष जाणार नाही. त्याला तिथे डावलून लोक पुढे जात राहतील. परंतु, एखादा श्रीमंत व्यक्ती मेला असेल, तर त्याच्या मयताला एखाद्या जत्रेचा स्वरूप प्राप्त होईल. हा फरक आहे गरीबात आणि श्रीमंतांमध्ये. एखादा गरीब पैशाअभावी दवाखान्यांमध्ये तडफडत जीवन जगत असतो, दुसऱ्या ठिकाणी महानायक अमिताभ बच्चन फक्त आजारी पडले तर देशभर होम हवन केले जातात. का ते हिरो आहेत, महानायक आहेत म्हणून नाही, ते पैसेवाले आहेत म्हणून. सचिन तेंडुलकरच्या पाठीचा जेव्हा स्नायू दुखावला होता तेव्हा संपूर्ण देश चिंताग्रस्त झाला होता. थोड्या वेळासाठी आपण एक चित्र समोर आणूया. समजा, सचिन तेंडुलकर यांचे शतकांचे शतक झालेले आहे. परंतु सचिनला पैसा मिळाला नाही.

सचिन एखाद्या झोपडपट्टीमध्ये राहायला असता. कुठल्याही गल्लीबोळातल्या पोरांसोबत खेळला असता. कुणालाही रस्त्यात येता जाता भेटला असता. तर आज जो मान सचिनला मिळतोय, तो मिळाला असता का. अमिताभ बच्चन जी एखाद्या झोपडपट्टीमध्ये राहायला असते, कुठल्याही गल्लीबोळातल्या पोरांसोबत हिंडले फिरले असते. भले ते महानायक असू द्या, त्यांनी खूप चांगलं काम केलं असू द्या, परंतु त्यांना पैसा मिळाला नसेल, ते गरीबच राहिले असते, तर कोणी त्यांच्यासाठी होम हवन केले असते का? त्यांना कोणी मान तरी दिला असता का? अर्थात नाही. का, कारण की ते पैसेवाले नाहीत. अर्थात, असे बरेचसे आहेत; परंतु या दोघांचे उदाहरण घेण्याचा एवढाच उद्देश की सर्व लोकांना समजावं. हे दोघं आपापल्या क्षेत्रातले देव माणसे आहेत. त्यांनी खूप मेहनत घेतली आहे. त्यानंतरच त्यांच्याकडे पैसा आला आहे. आणि तो त्यांचा हक्क आहे. म्हणूनच आपल्याकडे जर कुठली कला असेल आणि त्या कलेचा व्यापार करता येत असेल, तर त्यातून नक्कीच पैसा उभा करता येईल. याचा विचार करण्याची वेळ आली आहे. कुठलंही आवडीचा क्षेत्र निवडावं आणि त्यातून काही पैसा उभा करता येतो का, ते पाहणं गरजेचं झालं आहे. उत्पन्नाचे अनेक मार्ग शोधणे गरजेचे झाले आहे. मोठी ध्येय, मोठे स्वप्न उराशी बाळगणे गरजेचे झाले आहे. मोठे ध्येय ठेवलं आणि सातत्याने प्रयत्न करत राहिलं तर एक ना एक दिवस यश नक्कीच मिळणार. यावर विश्वास ठेवावा लागेल. मेहनत, जिद्द आणि चिकाटी या त्रिसूत्रीवर कुठलेही यश खेचून आणता येतं, हे दुनियातील अनेकांनी सिद्ध करून दाखवले आहे. जेवढी मोठी स्वप्न, जेवढी मेहनत जास्त, यश मिळण्याची शक्यता तेवढी वाढते. मर्सिडीज घेण्याचं स्वप्न पाहिलं आणि आपण साधी वॅग्नर घेऊ शकलो तरीसुद्धा ते आपलं यशच आहे. पण, त्यासाठी स्वप्न पाहिले पाहिजेत ध्येय ठेवलं पाहिजे. मेहनत घेतली पाहिजे.

पैसा आला तर जगातली सर्व सुख चुटकी सरशी विकत घेता येतात. हवी ती वस्तू हवी तेव्हा मिळते. मनाप्रमाणे आयुष्य जगता येतं. कशाचीही कमतरता भासत नाही. सुख-समृद्धीने भरलेलं आयुष्य असतं. इतरांपेक्षा आपण काहीतरी वेगळं केल्याचा आनंद असतो. माणूस म्हणून या धरतीवर आलो आहे तर माणसाने स्वतःचे एक तरी घर बांधावं. एक तरी चार चाकी गाडी घ्यावी. एकदा तरी जग सफारी करावी. इच्छा आकांक्षांचा चुराडा करत मन मारून जगण्यात काय अर्थ आहे. 'प्रयत्न कण रगडता वाळूचे तेलही गळे' असे म्हणतात ते उगाच नाही. धरतीवरची सर्व सुख उपभोगता आली पाहिजेत. जे आपल्यावर अवलंबून आहेत, त्यांची स्वप्न पूर्ण करता आली पाहिजेत. सर्व सुखांनी पायाशी लोळण घेतले पाहिजे. कुठलंही स्वप्न अधुरं नाही राहिलं पाहिजे. पुन्हा येऊ अथवा न येऊ, आता आलोच आहे तर काहीतरी करून जाऊ. म्हणून पैसेवाला व्हायचं आहे. **

# पिढीतील अंतर

मुक्तांगण
प्रा.शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७





वडिलांची चप्पल वयात आलेल्या मुलाला बरोबर होऊ लागली की त्याच्याशी मित्रासारखे वागावे, असे पूर्वी म्हणत असत. पुढील पिढीच्या उदयाची ती एक निशाणीच होती. पूर्वी पिढीतील अंतर अठरा ते वीस वर्षे होते. आता ते झपाट्याने कमी होत असल्याचे म्हटले जाते आणि जाणवतेही. मात्र, पूर्वीही पिढीत अंतर होते, आताही आहेच, हेही खरेच! ''हल्लीची पिढी फुकट गेली आहे. आमच्या वेळी असे नव्हते हो! ज्येष्ठांना मान देण्यात नवी पिढी कुचराई करते आहे, नाही का?'' या प्रकारच्या प्रतिक्रिया दर पिढीमध्ये कमी-अधिक प्रमाणात, समवयस्कांमध्ये व्यक्त होतात. पिढीतील अंतर आणि दोन पिढ्यांतील संवाद-विसंवाद, मतमतांतरे हे असणारच. काळानुसार त्यांची व्याप्ती, स्वरूप यामध्येही बदल होत जाणार, हेही साहजिकच आहे. समाज अनेक कुटुंबांचा होतो. कुटुंबातील सदस्यांची संख्या काळानुसार जास्त-कमी होत असली तरी त्यामध्ये विविध वयोगटातील सदस्य असतात. कौटुंबिक पार्श्वभूमी (जात, धर्म, वंश, भाषा, मूल्ये इ.) सारखीच असली तरी कुटुंबातील विविध वयोगटातील स्त्रीपुरुषांमध्ये एकसारखेपणा नसतो. भवतालचे वातावरण, शाळा, शिक्षक, मित्रपरिवार यांचा निश्चितच प्रत्येकाच्या व्यक्तिमत्त्व घडणीवर परिणाम होत असतो. कुटुंबातील सर्वांच्या जबाबदाऱ्या आणि कार्ये यामध्येही भिन्नत्व आढळते.

विज्ञान आणि तंत्रज्ञानातील गेल्या पन्नास वर्षांतील प्रचंड प्रगतीमुळे आणि उपलब्ध विविध समाज माध्यमांमुळे, सारे जग जवळ आल्याचे भासते आहे. याचा परिणाम कळत-नकळतपणे साऱ्या समाजावर आणि कुटुंबांवर झाला आहे. शिक्षण, नोकरी किंवा व्यवसाय यामुळे कुटुंबाच्या आर्थिक स्थितीवर, समाजातील स्थानावर परिणाम होतो. उच्चशिक्षित, उच्चउत्पन्न गटातील कुटुंबात मुला-मुलींना उच्च व्यावसायिक शिक्षण प्राप्त केल्यावर देशविदेशात उत्तम नोकऱ्या मिळतात. काहींना त्यासाठी राहते गाव, आईवडील यांच्यापासून दूर जावे लागते. उच्च उत्पन्नगटातील तरुण पिढीची मूल्ये ''खा-प्या मजा करा'' या स्वरूपाची असल्याने काही वेळा पिढ्यांतील संघर्ष वाढताना दिसतो. तर कधी तो सुप्त स्वरूपात राहतो. ज्येष्ठांनी जुन्या आठवणी सतत आळवण्यामुळे, नव्या पिढीतील मुलेमुली वैतागतात. आर्थिक संपन्नतेमुळे युवापिढीचे आवश्यक खर्च मागील पिढीतील ज्येष्ठांना अनावश्यक आणि चैनीचे वाटतात.

गेल्या सुमारे तीस/चाळीस वर्षांत उच्च उत्पन्न गटातील शहरी-निमशहरी भागातील कुटुंबातील मुलांची संख्या दोन किंवा तीनपर्यंतच मर्यादित राहिली आहे. मुलांचे पदव्युत्तर व्यावसायिक शिक्षण पूर्ण करताना अनेक पालक सर्वार्थाने थकतात. निवृत्तीनंतर मिळणारे आईवडिलांचे फंडाचे पैसे मुलांच्या विवाहांवर, त्यांच्या राहत्या जागांसाठी सढळपणे खर्च केल्याने म्हातारपणी अनेक पालक सर्वार्थाने ''विकलांग'' होतात. वाढते वय, वाढते आजार आणि वाढते वैफल्य असे दुष्टचक्र निर्माण होण्यापूर्वीच ते रोखण्याची गरज आहे. मुलांचे देशविदेशातील शिक्षण आणि त्यावरील खर्च करताना दिले जाणारे प्राधान्य योग्य आहे, पण त्यासाठी पालकांनी आपली सारी पुंजी संपवू नये. विवाह आटोपशीरपणे एका दिवसात पूर्ण झाल्यास, हौस भागेल आणि अनावश्यक खर्चही टळू शकेल. निवृत्तीनंतर पतीपत्नी यांना मुलानातवंडांचा सहवास हवा असतो. पण ते ''गोड पाश'' केव्हा जाचक ठरतील हे परस्परसंबंधांवर अवलंबून आहे.ग्रामीण आणि निमशहरी भागातून, तरुण मुलेमुली कॉर्पोरेट सेक्टरमधील नोकऱ्यांसाठी मुंबई, पुणे, बंगळुरू इ. महानगरांत राहू लागली आहेत. आई-वडिलांनी त्यांच्याबरोबर राहावे, असे त्यांना वाटते. विशेषतः त्यांच्या लहान मुलांचा संभाळ दिवसभर आणि रात्री उशिरापर्यंत, आपल्या मुलांच्या आजी-आजोबांनीच करावा, असे त्यांना वाटते. हे ''गोड पाश'' जाचक ठरतात, तेव्हा ज्येष्ठांची केविलवाणी अवस्था होते. विवाहित मुलींच्या विदेशातील, पहिल्या/दुसऱ्या बाळंतपणांसाठी आई-वडील सासू-सासरे यांना काही महिने आपले घरदार सोडून, अमेरिकेत किंवा युरोपात राहावे लागते. आई किंवा सासू यांना दिवसरात्र काम असते. पण बरोबरच्या बाबांना विदेश अल्पावधीतच ''सोन्याचा पिंजरा'' वाटू लागतो, पण सुटका नसते. या विविध गोष्टींची साधकबाधक विचार करण्याची गरज आहे. मुलाला उच्च शिक्षणासाठी विदेशी पाठवण्यासाठी, साधीशी नोकरी करणारा पिता लाखो रुपये जमा करण्याच्या प्रयत्नात होता. नोकरी संपल्यावर, तीन/चार वर्षांनी मिळणारी फंडाची सर्व रक्कम काढण्यासाठी अर्ज केल्यावर, कंपनीच्या समुपदेशकाने त्यांना समजावले, तेव्हा असे कळले की, तरुण मुलाने वडिलांना एवढी मोठी रक्कम कशी गोळा करणार, याविषयी काही विचारलेही नव्हते. संवादाचा अभाव अनेक प्रश्नांना जन्म देते. आई आणि मुलीचा जसा संवाद असतो, तसा मुलाचा आणि वडिलांचा संवाद क्वचितच होताना दिसतो. यासाठी ज्येष्ठ आणि युवा पिढीचा संवाद होणे गरजेचे आहे. नवीन गोष्टी शिकण्याची संधी ज्येष्ठांनी घ्यावी. केवळ युवा पिढीवर टीका न करता त्यांनाही समजून घेण्याची नितांत गरज आहे. या मार्गात येणारे अडथळे दूर करण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन सुसंवादातून काही कौटुंबिक नियम केले पाहिजेत. रात्रीचे जेवण सर्वांनी, तीन पिढ्यांनी एकत्र केल्यास संवाद वाढण्यास मदत होईल. परस्परांच्या कामांची, जबाबदाऱ्यांची कल्पना येईल. मात्र, त्यावेळी सर्वांनी मोबाईलपासून दूर राहण्याची गरज आहे. त्यामुळे आरोग्यपूर्ण परस्परसंबंध निर्माण होण्यास निश्चितच मदत होईल. ''व्यय आणि अपव्यय'' याचाही निर्णय वेळोवेळी घ्यायला हवा. जवळच्या कौटुंबिक सहली सहसंबंध वाढवण्यास मदत करतात. सुसंवादातून आणि कुटुंबात लोकशाही मूल्यांच्या जोपासनेतूनच कुटुंबातील सुख सर्वांना प्राप्त होण्यास निश्चितच मदत होईल. तुम्हाला काय वाटते, ते जरूर कळवावे. **

# राज्यात उणीधुणीचे राजकारण

जगन घाणेकर

राज्यात लोकसभा निवडणुकांचे चार टप्पे पूर्ण झाले असून, पाचव्या टप्प्यातील मतदान सोमवारी पार पडणार आहे. त्यामुळे आता पाचव्या टप्प्यातील प्रचाराच्या तोफा थंडावल्या आहेत. सर्वच पक्षातील नेतेमंडळी आजमितीला रस्त्यावर उतरून जोरदार प्रचार केला. दरम्यान, देशभरात अद्याप दोन टप्प्याचे मतदान होणे बाकी आहे. त्यामुळे खाणे-पिणे, विश्रांती या सर्वांकडे दुर्लक्ष करून आज प्रत्येक राजकीय नेता जीवघेण्या उन्हातही प्रचारासाठी राब राब राबतो आहे. सोबत कार्यकर्त्यांचा फौजफाटाही तितक्याच प्रमाणात झिजतो आहे. समस्त भारत भूमीला आज रणांगणाचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

युद्धात ज्याप्रमाणे रथी शत्रुपक्षातील रथीशी आणि महारथीसोबत लढतो, त्याप्रमाणे पक्षाची वरिष्ठ मंडळी अन्य पक्षांच्या वरिष्ठांना लक्ष करत आहेत, तर राज्य स्तरावरील मंडळींसमोरील पक्षाच्या राज्यस्तरावरील प्रमुखाला टीकेचा धनी करत आहेत. एकमेकांची उणीधुणी काढताना अनेकजण पातळ्या ओलांडत आहेत. गेल्या दोन वर्षांत राज्यातील राजकारणात अनेक स्थित्यंतरे झाल्याने कधीकाळी एखाद्यावर विश्वास टाकून खासगीत सांगितलेल्या गोष्टी आज प्रचारसभांतून चव्हाट्यावर मांडल्या जात आहेत. सत्तेत आल्यावर आम्ही नागरिकांसाठी काय काय करू हे सांगण्यापेक्षा समोरच्या पक्षातील मंडळी किती भ्रष्ट आणि खोटारडी आहेत याबाबतच्या गोष्टी रंगवून सांगण्यामध्ये राजकीय नेत्यांना यावेळी अधिक स्वारस्य जाणवते आहे. सर्वच पक्षांच्या सभांमध्ये आज हेच चित्र दिसून येत आहे. टीका करताना अनेक नेतेमंडळी शत्रुपक्षाच्या नेतेमंडळींच्या खासगी आयुष्यातील घटनांनाही विनाकारण उगाळताना दिसून येत आहेत. एकाने टीका केली म्हणून त्याला उत्तर देण्यासाठी समोरील पक्षाचा नेताही तितकीच जहरी टीका करण्याचा प्रयत्न करताना दिसतो आहे. वृत्तवाहिन्यांचे प्रतिनिधी या वाक् युद्धामुळे निर्माण झालेल्या भडक्यात तेल ओतण्याचे काम करत आहेत. अनेक ठिकाणी सभांमध्ये व्यासपीठावर आणि प्रेक्षकांमध्ये महिलावर्ग उपस्थित आहे, याचेही भान नेतेमंडळींना राहिलेले दिसत नाही. जो नेता गेल्या लोकसभा निवडणुकीत एका पक्षाचा प्रचार करत होता, तोच नेता यंदा जाहीर सभांतून त्याच पक्षाचे वाभाडे काढताना दिसतो आहे. अशा पक्षबदलू मंडळींच्या जुन्या ध्वनिचित्रफिती निवडणुकांच्या काळातच सामाजिक माध्यमांतून व्हायरल केल्या गेल्याने त्या पाहणाऱ्यांचे चांगलेच मनोरंजन घडत आहे.

सामान्य जनतेला निवडणुकांच्या माध्यमातून देशाला योग्य नेतृत्व द्यायचे आहे आणि आपल्या विभागाची काळजी घेणारा, लोकांच्या हाकेला धावून येणारा, विभागातील जनतेची कामे करणारा, जनतेच्या समस्या सोडवणारा, विभागाचा विकास घडवून आणणारा, आपल्या मतदानक्षेत्राशी कृतज्ञतेने वागणारा खासदार निवडायचा आहे. जनता सुज्ञ असल्याने ती योग्य तो निर्णय घेऊन आपल्या विभागातून योग्य उमेदवार निवडून आणणारच आहे. राजकीय सभांतून केल्या जाणाऱ्या टीकाटिप्पणीशी, आरोप-प्रत्यारोपांशी सामान्य जनतेला काहीच देणेघेणे नाही तरीही राजकीय पक्ष इतरांची उणीधुणी काढण्यात अधिक स्वारस्य का दाखवत आहेत? राज्याच्याच राजकारणाचा विचार केल्यास गेल्या वीस वर्षांत राज्यातील जनतेने सर्वच राजकीय पक्षांना राज्याची सत्ता चाखण्याची संधी दिली आहे, त्यामुळे कोणाची किती पात्रता आहे. कोणता पक्ष आणि कोणता नेता भ्रष्ट आहे आहे, कोणाला जनतेची काळजी आहे याबाबत नागरिकांचा चांगलाच अभ्यास झाला आहे. **

# भारत-रशिया मैत्रीची साक्ष देणारा स्तंभ

प्रतिनिधी

रशियन प्रवासी अफनासी निकितीन यांनी पहिल्यांदा सन १४६६ मध्ये भारताच्या किनारपट्टीवर पाय रोवले. त्यांच्या स्मरणार्थ रेवदंड्यातील को.ए.सो.स.रा. तेंडुलकर विद्यालयाच्या आवारात भारत व रशिया या दोन देशांचा मैत्रीस्तंभ उभारण्यात आला आहे. रशियन कल्चरल सोसायटी व को.ए.सो.संकुल यांच्या विद्यमाने भारत व रशिया मैत्रीस्तंभ १७ जानेवारी २००२ पासून दिमाखात उभा आहे.

रशियन कल्चरल सोसायटीच्या वतीने रेवदंडा ग्रामपंचायत तत्कालीन सरपंच सरोज वरसोलकर यांच्याशी भारताच्या भेटीवर आलेला पहिला रशियन प्रवासी अफनासी निकितीन यांचे रेवदंडा येथे स्मारक व्हावे, अशी सदिच्छा व्यक्त केली. त्यांनी माजी विरोधी पक्षनेते दत्ता पाटील यांच्याशी संपर्क केला. त्यामुळेच को.ए.सो. स.रा. तेंडुलकर विद्यालयाच्या आवारात पहिला रशियन प्रवासी अफनासी निकितीन यांच्या स्मरणार्थ रशिया व भारत मैत्रीस्तंभ उभारण्यास चालना मिळाली. या भारत व रशिया मैत्रीस्तंभ उभारण्यात स्वर्गीय ॲड. दत्ता पाटील यांचे मोठे योगदान आहे. या भारत व रशिया या दोन देशाच्या मैत्रीस्तंभाच्या कोनशिला व उद्घाटन कार्यक्रमास रशियातील ट्वेर राज्याचे उपराज्यपाल क्रिश्नोव्ह आयोरी, रशियन फेडरेशनचे ॲम्बेसेडर अलेक्झांडर एम कदाकिन, रशियन कान्सोल जनरल डिम्ट्री ए.कॅझेनोव्ह, रशियन फेडरेशनचे मुंबईतील व्हाईस कॅन्सॉल डा.डी.ई. चेलेशेव्ह आदींसह रायगड जिल्ह्यातील मान्यवर मंडळी उपस्थित होती.

अफनासी निकितीन हा पहिला रशियन साहसवीर, चौल बंदरात जुलै १४६६ मध्ये उतरला. यावेळी त्याला आपण भारत व रशिया मैत्रीच्या पाया रचलाय याची सुताराम कल्पना नव्हती. अफनासी निकितीन सातासमुद्रपार प्रवास करून आला, तो अत्यंत जीवघेणी व संकटांनी भरलेला होता. १४६६ साल, तेव्हा भारतात शिवकाळ सुरू होण्यास १६३ वर्षे अवकाश होता. विज्ञान शास्त्र जन्माला यायचे होते. मानव जमातच मध्ययुगीन काळात होती. रस्ते, आधुनिकता, संस्कृती हे शब्दही तयार झाले नव्हते. भारत व रशिया या देशांचे संबंध सुरू होण्यास ५०५ वर्षे बाकी होते. त्या काळात ट्वेर या रशियातील व्होल्गा नदीच्या तीरावरून हा साहसवीर निघाला होता. अनेक संकटे, लुटारू, नैसर्गिक आक्रमणे यांना तोंड देत अखेर अरबी समुद्रातून चौल बंदर येथे उतरला. अंतराळवीरापेक्षा कमी प्रतीचे हे साहस नव्हते, अफनासी निकितीनच्या या साहसाचा, धाडसाच्या इतिहास आणि त्याचबरोबर अफनासी निकितीनला काय,



पण त्याच्या पुढील अनेक पिढ्यांनाही कल्पना नसलेल्या भारत-रशिया मैत्रीचे प्रतिक रेवदंड्यातील को.ए.सो. शाळेच्या आवारात जिवंत होऊन भारत व रशिया मैत्रीस्तंभाच्या रूपाने उभे राहिले आहे. रशियन कल्चरल सोसायटी व को.ए.सो.संकुल यांच्या विद्यमाने पहिला रशियन प्रवासी अफनासी निकितीन यांच्या स्मरणार्थ भारत व रशिया मैत्रीस्तंभ संयुक्तपणे राबविण्यात आला आहे. रशियातील ट्वेर राज्यातील उपराज्यपाल क्रिश्नोव्ह आयोरी यांच्या हस्ते या स्मारकाची पायाभरणी करण्यात आली होती. अंदाजे सात लाख रूपये खर्च करून रशियन कल्चरल सेंटर यांनी हे स्मारक उभारले. यासाठी माजी विधानसभा विरोधी पक्षनेते दत्ता पाटील को.ए.सो.च्या माध्यमातून मोठे योगदान दिले आहे. १६०० मध्ये ईस्ट इंडिया कंपनी भारतात आली. तत्पूर्वी, ३४ वर्षे अगोदर रशियन प्रवासी अफनासी निकितीन हा रशियन साहसवीर भारतात समुद्रमार्गे चौलला आला होता. हा इतिहास त्यांच्या स्मरणार्थ उभारलेल्या भारत व रशिया मैत्रीस्तंभ नित्य देत आहे. हा मैत्रीस्तंभ भारत व रशिया या दोन देशांचे मैत्रीचे अतूट धागे इतिहास व वर्तमानकाळात तेवत राहणार आहे.

सन १९७१ साली भारताच्या पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी यांनी भारत व रशिया या दोन देशात मैत्री करार केला होता. पण, या दोन देशांच्या मैत्रीची सुरूवात १५ व्या शतकातच झाली होती. भारतातील गंगा व व्होल्गा या दोन मैत्रीचा प्रवाह हा पहिला रशियन प्रवासी अफनासी निकितीन यांच्या स्मरणार्थ भारत व रशिया मैत्रीस्तंभ चिरतंर स्मरणार्थ राहणार असून, भारत व रशिया या दोन देशांच्या मैत्रीची ग्वाही नित्य दिसेल. भारतात पहिला प्रवासी हा वास्को-द-गामा १७ व्या शतकात आल्याची नोंद आहे परंतु, त्यापूर्वीही रशियन प्रवासी अफनासी निकितीन हा भारतात आला होता. **

# जागतिक वस्तुसंग्रहालय दिन

शांताराम वाघ

संग्रह करण्याची वृत्ती मानवाला अगदी पूर्वीपासून आहे. आजही अनेकांच्या जवळ पूर्वीचे अनेक ग्रंथ, वस्तू जपून ठेवलेल्या असतात. आपल्या पूर्वजांच्या वस्तू मोठ्या अभिमानाने दाखविण्याची अनेकांना मोठी हौस असते. ग्रीस देशात अशी अनेक मंडळी अस्तित्वात होती की, ज्यांना वस्तू व इतर अनेक गोष्टी जपून ठेवण्याची सवयच होती. त्यातूनच वस्तुसंग्रहालये यांचा जन्म झाला. इसवी सन पूर्व २८० या वर्षी टोलेमीने इजिप्तमध्ये अलेक्झांड्रिया या शहरात पहिले संग्रहालय स्थापन केले. भारतातसुद्धा संग्रहालयाचा इतिहास खूप जुना आहे. आज जगातील २०२ देशांत जवळपास ५५,००० हून अधिक संग्रहालये अस्तित्वात आहेत. जगातील सर्वात जास्त प्रेक्षक म्हणजेच ८१ लाख दरवर्षी पॅरिस



येथील संग्रहालयाला भेट देतात. भारतात १७८७ मध्ये पहिले संग्रहालय कलकत्ता येथे एम्प्रियाल म्युझियम म्हणून उदयास आले. आज ते इंडियन म्युझियम या नावाने ओळखले जाते. पहिले संग्रहालय डॉक्टर वालिस या डॅनिश शास्त्रज्ञांच्या प्रेरणेने झाले. त्यानंतर १८५० मध्ये मद्रासमध्ये एक संग्रहालय स्थापन झाले. महाराष्ट्रात १८८३ मध्ये नागपूर येथे सेंट्रल म्युझियम नावाचे संग्रहालय स्थापन झाले. महाराष्ट्र राज्यातील हे सर्वात जुने संग्रहालय आहे. आजही या संग्रहालयात ४००० पेक्षा जास्त वस्तू आहेत. भारतात अनेक संस्थानिकांनी त्यांच्या संस्थानात संग्रहालयाची स्थापना केली. त्यात सातारा जिल्ह्यातील औंध येथील राजे भवानराव पंतप्रतिनिधींनी स्थापना केलेले भवानी संग्रहालय तसेच सांगली येथे राजे पटवर्धन यांनी स्थापन केलेले संग्रहालय ही प्रसिद्ध आहेत. पुण्यामध्ये राजा केळकर संग्रहालय, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील सिंबायसेस विद्यापीठाचे संग्रहालय, आदिवासी संशोधन केंद्र पुणे, डेक्कन कॉलेज पुणे यांच्या अंतर्गत असणारे पुरातत्व व मराठा इतिहास संग्रहालय आगाखान पॅलेस संग्रहालय, पेशवे संग्रहालय पर्वती महात्मा फुले संग्रहालय, लोकमान्य टिळक संग्रहालय, राष्टीय लष्करी संग्रहालय ही प्रसिद्ध संग्रहालये आहेत. संग्रहालयात अनेक वस्तू, कला तसेच ऐतिहासिक परंपरा यांचे जतन केले जाते. संग्रहालये ही समाज शिक्षणासाठी अत्यंत उपयुक्त आहेत. प्रत्येक व्यक्तीच्या ज्ञानात भर टाकण्याचे काम ती करत असतात. **

**निवडक**

### रोहित भविष्याचा मालक

**मुंबई :** मुंबईला पाचवेळा विजेतेपद मिळवून देणारा रोहित शर्मा पुढील आयपीएल कोणत्या संघाकडून खेळणार, याबाबत तर्क वितर्क सुरु आहेत. मुंबईचे कोच मार्क बाऊचर यांनी एक वक्तव्य केले आहे. त्या वक्तव्यामुळे तिढा आणखी वाढला आहे. बाऊचर म्हणाले, रोहित स्वत:च्या भविष्याचा मालक आहे. आयपीएलच्या आगामी मेगा ऑक्शनसंदर्भात रोहितच्या आगामी प्लॅनबाबत काही माहिती नाही. रोहितने चेन्नई विरुद्ध शतक केले होते. रोहितचा हाच फॉर्म कायम राहील,असे वाटले होते, असे बाऊचर म्हणाले.

### रैनामुळेच ‘विराट’ कोहली

**नवी दिल्ली :** आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये विराटने त्याचा दबदबा निर्माण केला आहे. याशिवाय त्याने सचिनच काय तर अनेक आजी-माजी खेळाडूंचे विक्रम मोडले आहेत. पण, विराट जेव्हा कुणीच नव्हता तेव्हा त्याला मदत करणारे अनेक जणं होती आणि त्यापैकी एक नाव हे सुरेश रैना आहे. विराटने २००८ मध्ये रैनाने कशी त्याला मदत केली आणि त्यामुळे तो निवड समितीच्या नजरेत आला हे सांगितले. २००८ ते २०२४ या काळात विराटने कारकिर्दीत खूप काही साध्य केले आहे आणि त्यामुळेच तो जागतिक स्तरावर एक आयकॉन बनला आहे.

### विराट कोहलीची नाराजी

**नवी दिल्ली :** आयपीएल हंगामात इम्पॅक्ट प्लेअर नियमाची जोरदार चर्चा सुरू आहे. रोहित शर्माने यापूर्वीच या नियमावर नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर आता विराट कोहलीने देखील या वादात उडी घेतली आहे. विराट कोहली म्हणाला की, मी याबाबतीत रोहित शर्माचे समर्थन करतो. मनोरंजन हा खेळाचा एक भाग आहे. मात्र, त्यात समतोल असला पाहिजे. इम्पॅक्ट प्लेअरमुळे समतोल बिघडला आहे. यामुळे अष्टपैलू खेळाडूंवर परिणाम होत आहे. हे असे अनेक जणांना वाटत आहे.

### गीलची भावनिक पोस्ट

**मुंबई :** हैदराबाद आणि गुजरात यांच्यातील सामना गुरुवारी पावसामुळे रद्द करण्यात आला. या मोसमातील गुजरातचा हा शेवटचा सामना होता. या सामन्यानंतर शुभमन गिलने एक भावनिक पोस्ट केली. त्याने लिहिले, आम्हाला अशा प्रकारचा शेवट अपेक्षित नव्हता, पण हा सीझन शिकण्याने आणि अनेक छान आठवणींनी भरलेला आहे. मी तीन वर्षांपासून या सुंदर कुटुंबाचा एक भाग आहे. मी कधीही विसरणार नाही, असा हा प्रवास होता. मला त्या सर्व चाहत्यांचे आभार मानायचे आहेत ज्यांनी आम्हाला कठीण काळात साथ दिली

### ३० सेकंदात जागतिक विक्रम

**पुणे :** पुण्यातील लोणीकंद येथील आलविना देशमुख हिने ‘हुला हूप’ या खेळात जागतिक विक्रम केला आहे. फक्त ३० सेकंदात ७१ राऊंड पूर्ण करत तिने ही कामगिरी केली. सर्वात कमी वयात हुला हूपमध्ये विश्वविक्रम केल्याने आलविनावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. हुला हूप म्हणजे एक गोल रिंग कंबरेच्या भोवती गोल फिरवायची असते. या खेळात आपण कमरेचा व्यायाम करतो त्याचप्रमाणे गोल रिंग कमरेभोवती फिरवायची असते. कमरेचा हाच व्यायाम एका गोल रिंग सोबत केला जातो. त्याचाच हुला हूप असे म्हटले जाते.

## मुंबईचा शेवटही लाजिरवाण्या पराभवानेच

# रोहितची अर्धशतकी खेळी व्यर्थ

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

रोहित शर्मा आणि नमन धीर यांच्या अर्धशतकानंतरही मुंबई इंडियन्सला पराभवाचा सामना करावा लागला. लखनौ सुपर जायंट्सने दिलेल्या २१५ धावांच्या आवाहनाचा पाठलाग करताना मुंबई इंडियन्सचा संघ १९६ धावांपर्यंत पोहचला. लखनौ सुपर जायंट्सचा शेवट गोड झाला. यावेळी लखनौ सुपर जायंट्सने मुंबई इंडियन्सचा १८ धावांनी पराभव केला. मात्र, मुंबईचा शेवट खराब झाला. यासोबत साखळी फेरीतील अखेरचा सामनाही त्यांना गमावावा लागला. मुंबई इंडियन्सला १४ सामन्यांत फक्त ४ विजय मिळवता आले असून गुणतालिकेत मुंबई इंडियन्सचा संघ तळाला दहाव्या क्रमांकावर आहे.



लखनौ सुपर जायंट्सने दिलेल्या २१५ धावांच्या आवाहनाचा पाठलाग करताना मुंबई इंडियन्सची सुरुवात शानदार झाली. रोहित शर्मा आणि डेवॉल्ड ब्रेविस यांनी आक्रमक सुरुवात केली. विशेष म्हणजे रोहित शर्मांने लखनौ सुपर जायंट्सची गोलंदाजी फोडली. रोहित आणि ब्रेविस यांनी ८८ धावांची भागिदारी केली. ब्रेविस फक्त २३ धावा काढून बाद झाला. त्याने २० चेंडूत दोन षटकार आणि एक चौकार ठोकला. नवीन उल हकने ब्रेविसला तंबूत धाडत लखनौ सुपर जायंट्सला पहिले यश मिळवून दिले. त्यानंतर मुंबई इंडियंन्सचा डाव ढासळला. दुसऱ्या बाजूला विकेट पडत गेल्या. अनुभवी सूर्यकुमार यादव याला खातेही उघडता आले नाही. कृणाल पांड्याने सूर्यकुमार यादवला शून्यावर बाद केले.

### पुरन ठरला मुंबईचा कर्दनकाळ

पुरनने यावेळी सावधपणे सुरुवात केली खरी, पण काही वेळातच त्याने आपल्या फलंदाजीचा गिअर बदलला. पुरनने स्थिरस्थावर झाल्यावर मुंबईच्या गोलंदाजीचा चांगलाच समाचार घेतला. पुरनने यावेळी १५ व्या षटकात तब्बल २९ धावांची लूट केली आणि आपले अर्धशतकही पूर्ण केले. या १५ व्या षटकाचे पहिले दोन चेंडू अर्जुन तेंडुलकरने टाकले. या दोन्ही चेंडूंवर पुरनने दोन षटकार लगावले. पण त्यानंतर अर्जुनने मैदान सोडले. त्यामुळे त्याचे षटक नमन धीरने पूर्ण केले. पण गोलंदाज बदलला असला तरी पुरनने आपली धडकेबाज फटकेबाजी सुरु केली. पुरनने या षटकात चार षटकार आणि एका चौकारासह २९ धावा लुटल्या.

### रोहितचे शानदार अर्धशतक

रोहित शर्माने शानदार फलंदाजी केली. विश्वचषकाआधी रोहितने शानदार अर्धशतक ठोकले. ३८ चेंडूमध्ये ६८ धावांचा पाऊस पाडला. लखनौच्या एकाही गोलंदाजाला त्याने सोडले नाही. प्रत्येकाचा खरपूस समाचार घेतला. रोहितने चौफेर फटकेबाजी केली. रवि बिश्नोईने रोहितला बाद करत लखनौला सर्वात मोठे यश मिळवून दिले. रोहितने ३८ चेंडूमध्ये तीन षटकार आणि दहा चौकारांच्या मदतीने ६८ धावा चोपल्या.

## पांड्यावर एका मॅचसाठी बंदी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबईचा यंदाच्या आयपीएलमधील दहावा पराभव लखनौ सुपर जाएंटस विरुद्ध झाला. लखनौने पहिल्यांदा फलंदाजी करताना ६ गडी गमावत २१४ धावा केल्या होत्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना मुंबई ६ गडी गमावत १९६ धावांपर्यंत मजल मारली. या मॅचदरम्यान स्लो ओव्हर रेट प्रकरणी बीसीसीआयने हार्दिक पांड्या आणि मुंबईच्या इतर खेळाडूंवर कारवाई केली आहे.



यावेळी हार्दिक पांड्यावर एका मॅचची बंदी घालत ३० लाख रुपयांचा दंडही आकारला आहे. मुंबईकडून तिसऱ्यांदा अशा प्रकारची चूक झाल्याने ही कारवाई करण्यात आली आहे. याशिवाय संघातील खेळाडूंना ज्यामध्ये इम्पॅक्ट प्लेअरचा देखील समावेश असेल त्यांनी १२ लाख रुपये किंवा मॅच फीच्या ५० टक्के रक्कम जी कमी असेल ती भरावी लागणार आहे.

जरी पांड्या पुढच्या हंगामात दुसऱ्या संघाकडून खेळला तरी त्याच्यावर ही बंदी कायम राहणार आहे. यंदाच्या आयपीएलमध्ये तिसऱ्यांदा मुंबईला स्लो ओव्हर रेट प्रकरणी कारवाईला सामोरे जावे लागले आहे.

# सात्विक-चिराग उपांत्य फेरीत

**। बँकॉक । वृत्तसंस्था ।**

भारताच्या दोन जोड्यांनी थायलंड ओपन बॅडमिंटन स्पर्धेत उपांत्य फेरीत पाऊल ठेवले. सात्विक साईराज रंकीरेड्डी-चिराग शेट्टी या जोडीने पुरुष दुहेरीत; तर अश्विनी पोन्नाप्पा-तनीषा क्रॅस्टो या जोडीने महिला दुहेरीत अंतिम चारमध्ये पाऊल ठेवले.



सात्विक रंकीरेड्डी-चिराग शेट्टी या जोडीने उपांत्यपूर्व फेरीच्या लढतीत मलेशियाच्या जोडीवर मात केली. सात्विक-चिराग जोडीने जुनैदी अरीफ-रॉय किंग याप या जोडीवर २१-१७, २१-१४ अशी सहज मात केली. भारतीय जोडीने अवघ्या ३८ मिनिटांमध्ये विजयाला गवसणी घातली. अश्विनी पोन्नाप्पा-तनीषा क्रॅस्टो या भारतीय जोडीने ली यू लीम-शिन चॅन या दक्षिण कोरियाच्या जोडीवर रोमहर्षक विजय नोंदवला. भारतीय जोडीने पहिला गेम २१-१५ असा जिंकत आघाडी मिळवली, पण दक्षिण कोरियाच्या जोडीने दुसरा गेम जिंकत झोकात पुनरागमन केले.

दक्षिण कोरियाच्या जोडीने २३-२१ अशी या गेममध्ये बाजी मारली. तिसऱ्या गेममध्ये भारतीय जोडीने जबरदस्त पुनरागमन केले. अश्विनी-तनीषा या जोडीने अखेरच्या गेममध्ये २१-१९ असे यश मिळवले. दबावाखाली भारतीय जोडीने खेळ उंचावला व पुढल्या फेरीत प्रवेश केला. पुरुष एकेरीत निराशाभारताला दुहेरीत यश मिळाले असले तरी एकेरीत मात्र निराशेला सामोरे जावे लागले. पुरुषांच्या एकेरीत मेईराबा मेसनाम याची घोडदौड शुक्रवारी संपुष्टात आली. चौथा मानांकित कुनलावूत वितिदसर्ण याने मेसनाम याच्यावर २१-१२, २१-५ असा सरळ दोन गेममध्ये विजय संपादन करीत अंतिम चारपर्यंत वाटचाल केली. मेसनामचा ३४ मिनिटांमध्ये पराभव झाला.

## खुल्या टेनिस स्पर्धेचे आयोजन

**। पुणे । प्रतिनिधी ।**

मंदार वाकणकर टेनिस अकादमी व गोल्ड लिफ यांच्यातर्फे व पुणे मेट्रोपॉलिटन जिल्हा टेनिस संघटना(पीएमडीटीए) यांच्या मान्यतेखाली टीपीएल पीएमडीटीए खुल्या टेनिस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा १८ ते १९ मे या कालावधीत सप महाविद्यालय टेनिस कोर्ट येथे होत आहे. स्पर्धेत शहरातून ६० खेळाडूंनी आपला सहभाग नोंदवला असून हि स्पर्धा पुरूष व महिला एकेरी गट, ३५ वर्षांवरील पुरुष व खुला दुहेरी गटात होणार आहे. स्पर्धेतील विजेत्या व उपविजेत्या खेळाडूंना करंडक व प्रशस्तिपत्रक अशी पारितोषिके देण्यात येणार आहेत.

## बॉक्सर परवीन निलंबित

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताच्या पॅरिस ऑलिंपिकमध्ये दमदार कामगिरी करण्याच्या आशांना शुक्रवारी सुरुंग लागला आहे. भारताची महिला बॉक्सर परवीन हुडा हिला जागतिक उत्तेजक विरोधी संघटनेकडून (वाडा) २२ महिन्यांसाठी निलंबित करण्यात आले आहे. यामुळे आता ५७ किलो वजनी गटासाठी भारतीय बॉक्सिंग संघटनेला इतर खेळाडूची निवड करून तिला पात्रता फेरीत खेळवावे लागणार आहे.



परवीन हुडा हिने आशियाई क्रीडा स्पर्धेत ब्राँझपदक पटकावत भारतासाठी पॅरिस ऑलिंपिकचा कोटा मिळवला होता, पण एप्रिल २०२२ ते मार्च २०२३ या दरम्यान १२० महिन्यांच्या कालावधीत परवीनकडून वाडाच्या नियमांचे उल्लंघन करण्यात आले आहे. तीन वेळा ठावठिकाण्याची निश्चित माहिती न दिल्यामुळे २२ महिन्यांसाठी तिला निलंबित करण्यात आले आहे. निलंबनाच्या शिक्षेपैकी १४ महिन्यांची शिक्षा अद्याप बाकी आहेत. त्यामुळे तिला पॅरिस ऑलिंपिकमध्ये सहभागी होता येणार नाही.

येत्या २४ मे पासून अखेरच्या ऑलिंपिक पात्रता फेरीला बँकॉक येथे सुरुवात होणार आहे. भारतीय संघटनेकडून आता ५७ किलो वजनी गटासाठी इतर खेळाडूंचा पर्याय शोधावा लागणार आहे. ११ एप्रिलपर्यंत नोंदणी असलेल्या खेळाडूंनाच याप्रसंगी संधी मिळणार आहे. याचा अर्थ हा कोटा गमावण्याची आपत्ती भारतावर ओढवू शकणार आहे. सध्या निखत झरीन, प्रीती व लवलीना बोर्गोहेन या तीनच खेळाडूंनी भारतासाठी ऑलिंपिक कोटा मिळवलेला आहे.

## आंतरराष्ट्रीय अनुभवावर खेळाडूंची निवड

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

टी-२० विश्वचषक २०२४ सुरु व्हायला काही दिवस शिल्लक राहिले आहेत. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारताचा संघ यंदाचा टी-२० विश्वचषक खेळणार आहे. काही महिन्यांपूर्वी झालेला एकदिवसीय विश्वचषकादरम्यान भारताचा उपकर्णधार हार्दिक पांड्या जखमी झाला होता. त्याचबरोबर त्याला मुंबइचे कर्णधार पद दिल्यामुळे त्याला ट्रोलिंगचा सामना करावा लागला होता. विश्वचषकासाठी घोषणा करण्यात आलेल्या खेळाडूंवर प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. यावेळी हार्दिक पांड्याच्या निवडीवर अनेक प्रश्न उपस्थित झाले होते. अनेक मीडिया रिपोर्टमध्ये म्हटले जात होते की, हार्दिक पांड्याची निवड दबावाखाली करण्यात आली आहे, प ण या गोष्टींमध्ये किती तथ्य आहे? या प्रश्नाचे उत्तर बीसीसीआयचे सचिव जय शाह यांनी दिले आहे.



जय शाह यावेळी म्हणाले की, खेळाडूंची निवड केवळ आयपीएल कामगिरीच्या आधारे केली जात नाही. याशिवाय इतरही अनेक बाबी विचारात घेतल्या होत्या. विशेषत: एखाद्या खेळाडूला किती आंतरराष्ट्रीय अनुभव आहे. तसेच, जय शाह यांनी हार्दिक पांड्याला दबावाखाली निवडले गेल्याचे सर्व दावे फेटाळून लावत टी-२० विश्वचषकासाठी भारतीय संघाबाबत आपले मत व्यक्त केले. रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील संघ उत्कृष्ट आहे. अनुभवी खेळाडूंशिवाय युवा खेळाडूंचा चांगला मेळ आहे, असे त्यांनी सांगितले.

## गंभीरला प्रशिक्षकपदाची ऑफर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

राहुल द्रविडनंतर भारतीय संघाला शिकवणी देण्यासाठी प्रशिक्षकाची नेमणूक करण्यात येणार आहे. त्यासाठी बीसीसीआयने अर्ज मागितले आहेत. न्यूझीलंडचा दिग्गज स्टिफन प्लेमिंग आणि रिकी पाँटिंग यांना दावेदार मानले जात आहे. पण आता या स्पर्धेत गौतम गंभीर असल्याचेही समोर आले आहे. एका रिपोर्ट्सनुसार, बीसीसीआयकडून गौतम गंभीरला भारतीय संघाच्या प्रशिक्षक पदासाठी ऑफर देण्यात आली आहे. पण गौतम गंभीर ही ऑफर स्वीकारणार का, हे पाहावे लागेल. राहुल द्रविडचा कार्यकाळ टी-२० विश्वचषकानंतर संपुष्टात येत आहे. राहुल द्रविडने थांबायचे ठरवले आहे, व्हीव्हीएस लक्ष्मणनेही अर्ज करण्यास नकार दिला आहे. त्यामुळे भारतीय संघाचा नवा प्रशिक्षक कोण, याची उत्सुकता शिगेला पोहचली आहे. १ जुलैपासून भारतीय संघाला नवील प्रशिक्षक मिळणार आहे. बीसीसीआयची मागणी गौतम गंभीर मान्य करणार का, हे काही दिवसांतच स्पष्ट होईल. तसेच, गंभीर हा लखनौ सुपर जायंट्सचा २०२२ आणि २०२३ च्या हंगामात मेंटॉर होता. दोन्ही हंगामात लखनौने प्ले ऑफ गाठली होती. या हंगामात तो कोलकाताचा मेंटॉर म्हणून काम करत आहे. कोलकाताने यंदाच्या हंगामात अव्वल स्थान मिळवत प्ले ऑफमध्ये दिमाखात प्रवेश केला आहे.



## विश्वचषकापूर्वी भारतीय संघ सराव सामना खेळणार

**नवी दिल्ली :** पुढील महिन्यात अमेरिका आणि वेस्ट इंडीजमध्ये खेळल्या जाणाऱ्या टी-२० विश्वचषकापूर्वी भारतीय संघ एक सराव सामना खेळणार आहे. बीसीसीआयला भारताचा सराव सामना न्यूयॉर्कमध्ये आयोजित करायचा आहे, कारण संघ न्यूयॉर्कच्या स्टेडियममध्ये चार ग्रुप स्टेजमधील सामने खेळणार आहे. आयसीसीने अद्याप सराव सामन्यांचे वेळापत्रक जाहीर केलेले नाही, परंतु इंग्लंड आणि पाकिस्तान हे दोन सराव सामने खेळण्याची शक्यताही कमी आहे. उर्वरित संघ प्रत्येकी दोन सराव सामने खेळण्यासाठी सज्ज आहेत. भारतीय संघ दोन बॅचमध्ये विश्वचषकासाठी रवाना होणार आहे. संघाच्या रवानगीतही बदल करण्यात आला आहे. आयपीएलचा पहिला लीग टप्पा संपल्यानंतर भारतीय संघाची पहिली तुकडी २१ मे रोजी न्यूयॉर्कला रवाना होणार होती. आता २५ आणि २६ मे रोजी संघ दोन बॅचमध्ये रवाना होणार असल्याची माहिती मिळाली आहे. २६ मे रोजी आयपीएल फायनलमध्ये सहभागी होणारे खेळाडू नंतरच्या तारखेला रवाना होतील.

## भारत-पाकिस्तान सामन्याची क्रेझ

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

टी-२० विश्वचषकाला आता फक्त दोन आठवड्याचा कालावधी शिल्लक राहिला आहे. २ जूनपासून टी-२० विश्वचषकाच्या थराराला सुरुवात होणार आहे. यंदाच्या विश्वचषकात पहिल्यांदाच २० संघाचा सहभाग असणार आहे. भारताचा पहिला सामना ५ जून रोजी आयर्लंडविरोधात होणार असून भारत आणि पाकिस्तानच्या लढतीकडे सर्वांच्या नजरा लागलेल्या आहेत.

### ■ तिकीटाचे दर तिपटीने महागले



विश्वचषकतात भारत आणि पाकिस्तान या पारंपारिक प्रतिस्पर्ध्यांमध्ये ९ जून रोजी आमना-सामना होणार आहे. न्यूयॉर्कमध्ये होणाऱ्या या सामन्याची तिकटे लाखो-करोडोमध्ये विकली जात आहेत. चाहत्यांमध्ये भारत आणि पाकिस्तानच्या लढतीकडे लक्ष असणार आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये ९ जून रोजी होणाऱ्या तिकिटांची किंमत लाखोंमध्ये असल्याचे समोर आले आहे.

भारत आणि पाकिस्तान यांच्यामधील सामना न्यूयॉर्कच्या नसाऊ काऊंटी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर होणार आहे. या सामन्याचे सर्वात स्वस्त तिकिट यूएस करेन्सीनुसार २५०० डॉलर इतकी असल्याचे समोर येत आहे. भारतीय रुपायत याची किंमत दोन लाख रुपयांपेक्षा जास्त असेल. जर एकाच कुटुंबातील चार जण सामना पाहायला गेले तर त्यांना १० हजार डॉलर रुपये मोजावे लागतील. म्हणजे, त्यांना तब्बल ८.४ लाख रुपयांचे तिकिटे खरेदी करावी लागतील. तसेच, सर्वात महागडे तिकिट १.८६ कोटी रुपये इतके आहे. याआधी वनडे विश्वचषकाच्या सामन्यातील सर्वात महागडे तिकिट ५७ लाख रुपये इतके होते. म्हणजे, अमेरिकेत हे तिकिट तिप्पट महागडे आहे.

## महिलांचा विश्वचषक ब्राझीलमध्ये

**। बँकॉक । वृत्तसंस्था ।**

आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधील दिग्गज संघ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ब्राझील या देशामध्ये २०२७ मधील महिलांच्या फुटबॉल विश्वकरंडकाचे आयोजन करण्यात येणार आहे. फिफाकडून या निवडीवर शुक्रवारी शिक्कामोर्तब करण्यात आले. २०२७ मधील महिला विश्वचषकाच्या आयोजनासाठी चार ठिकाणांहून प्रयत्न करण्यात आले होते. ब्राझीलसह मेक्सिको, अमेरिका, दक्षिण आफ्रिका, बेल्जियम, जर्मनी व नेदरलँड यांनी आयोजनासाठी कंबर कसली होती. दक्षिण आफ्रिका व मेक्सिको-अमेरिका यांनी माघार घेतल्यामुळे ब्राझील व युरोपमधील देशांमध्ये थेट लढत झाली. फिफाशी संलग्न असलेल्या २०७ देशांनी मतदान केले. यामध्ये ब्राझीलने ११९ मतांसह विजय संपादन केला. युरोपियन देशांना ७८ मते मिळाली. त्यामुळे ब्राझीलला यजमानपदाचा मान मिळाला.



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, आॅर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(✻ या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)